cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–८८ | सोमवार दि.८ जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### ‘एक देश एक कर’ ही शुद्ध धूळफेक ठरलीय !

भारतीय कररचनेतील महत्त्वपूर्ण सुधारणा ही वस्तु व सेवाकर–जीएसटीच्या स्वरुपात राबवली जात आहे. १ जुलै २०17 रोजी या महत्त्वपूर्ण व धाडसी करसुधारणेस प्रारंभ झाला व आता सात वर्षांची सप्तपदी पूर्ण झाली आहे. केवळ ६ वस्तूवर आकारला जाणारा कर आता अपवादात्मक काही वस्तू व सेवा वगळता सर्वव्यापी झाला

### आसाममधील पूरस्थिती गंभीर,मृतांचा आकडा ६४ वर

दिसपूरः आसाममधील पूरस्थिती गंभीर बनली आहे. यामुळे येथील जवळपास २४ लाख लोक प्रभावित झाले आहेत. अनेक नद्या धोक्याच्या पातळी ओलांडून वाहत आहेत. आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार, रविवारपर्यंत पाऊस आणि पुरांशी संबंधित घटनांमधील मृतांचा आकडा ६४ वर पोहोचल्याची नोंद झाली आहे. १० जूनपासून आसामला प्रभावित करणारी ही दुसरी गंभीर पुरस्थिती आहे. आसाममधील पुराने ३,५३५ गावांमधील सुमारे २३.९ लाख लोक प्रभावित झाले आहेत. तर ५० हजारांहून अधिक लोकांनी राज्यातील निवारागृहात आश्रय घेतला आहे.

# उद्धव ठाकरे शेतकऱ्यांच्या बांधावर!

## » संभाजीनगरच्या शेतकरी बांधवांसोबत साधला संवाद



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी संभाजीनगर तालुक्यातील निपाणी शिवारात थेट बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. शेतात असलेल्या पिकांची त्यांनी पाहणी केली करीत माहिती घेतली. पेरणी झाल्याच्या एक महिन्यानंतर पाऊस नसल्याने करपत असलेल्या पिकांबाबतही त्यांनी शेतकऱ्यांशी चर्चा केली.**

बी – बियाणे, रासायनिक खते यांच्या दराची माहिती घेऊन वाढलेल्या दरांमुळे शेतकऱ्यांना होत असलेल्या त्रासाची त्यांनी माहिती घेतली. राज्य सरकार फसव्या घोषणा करत असून त्यांचा लाभ स्थानिक पातळीवर आम्हाला मिळत नसल्याची खंत यावेळी शेतकऱ्यांनी उद्धव ठाकरे यांच्यासमोर मांडली. उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात झालेल्या कर्जमाफीचा आम्हाला फायदा मिळाला आहे. दोन लाखापर्यंत झालेली ही कर्जमाफी सर्वापर्यंत पोहोचली. परंतु त्यानंतर आलेले महायुतीचे सरकार शेतकऱ्यांची फसवणूक करत असून पिक विमा, शेतकरी अनुदान व दुष्काळ अनुदान आलेले नसल्याची कबुली यावेळी शेतकऱ्यांनी दिली. रोजंदारीने शेतात कामासाठी आलेल्या एका महिलेसोबत शाळकरी मुलगा आलेला होता. त्यांच्याशी संवाद साधत हा मुलगा शाळेत का जात नाही याची ठाकरे यांनी विचारपूस केली. आर्थिक हलाखिमुळे प्रवेश घेता येत नसल्याची

◀◀ पान २ वर

### दोन मुलांच्या मृत्यूनंतर आईनेही सोडला प्राण

कोल्हापूर : नियती किती निष्ठूर, हातातोंडाशी आलेली दोन्ही मुले विजेचा धक्का लागल्याने गमावली, त्यानंतर आई नंदाताई पाटील यांना रक्षाविसर्जनालाच हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यातच आईने सुध्दा आपला प्राण सोडल्याची दुख:दायक घटना कोल्हापुर जिल्ह्यातील शाहुवाडी तालुक्यातील कोपार्डे यागावात घडली. नंदा यांचे पती, सून आणि एक वर्षांची नात यांचे दु:ख कधीही न भरणारे आहे. नंदाताई पाटील यांच्यावर शोकाकुल वातावरणात रविवारी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. पाटील कुटुंबांविषयी पंचक्रोशीत हळहळ व्यक्त होत आहे.

# मराठ्यांना त्रास देणाऱ्या ओबीसी नेत्यांना पाडा

## मनोज जरांगे यांचा भुजबळांवर निशाणा, सरकारला इशारा अन् मराठ्यांना आवाहन



**परभणी । प्रतिनिधी**

छगन भुजबळ आतापर्यंत ओबीसी मतदानाची भीती दाखवत होता. त्याला आता कळलं मराठा मत काय आहे. ते मला गावठी समजत होते, गावठ्याने कसा हिसका दाखवला. असे सांगून भुजबळांवर निशाणा साधत मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला शेवटचा इशारा दिला आहे. तर मराठ्यांना त्रास देणाऱ्या ओबीसी नेत्यांना विधानसभेत पाडा, असे असे आवाहन त्यांनी या जाहीर सभेतून केले. मराठवाडा दौऱ्या दरम्यान मनोज जरांगे पाटील रविवारी परभणीत होते. यावेळी त्यांनी

◀◀ पान २ वर

### “ मराठा नेत्यांना काय आवाहन?

*मी तुम्हाला माय बाप मानले, लेकरू म्हणून माझ्या डोक्यावर हात ठेवा. आरक्षणाचां गुलाल पडेपर्यंत थांबत नाही. माझ्या मराठा समाजाच्या मुलाला मोठं केल्याशिवाय शांत बसणार नाही. मी गद्दार म्हणून मारणार नाही, तुमच्या पायावर मरणार आहे. तुमची ताकत वाया जाऊ देणार नाही, असा शब्दही मनोज जरांगेंनी यावेळी दिला.*

### “ उद्धव ठाकरेंचा मनोज जरांगेंना फोन, पण...

*मराठा समाजाला सरसकट ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीची राज्य सरकारला आठवण करुन देण्यासाठी उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी हिंगोलीतून आपल्या शांतता रॅलीला सुरुवात केली आहे. जरांगे पाटील रविवारी परभणी दौऱ्यावर परभणीतही त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. दुसरीकडे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हेही संभाजीनगर दौऱ्यावर आहेत. या दरम्यान, त्यांनी मनोज जरांगेंना फोन केला. मात्र, दोघांचे फोनवर बोलणे होऊ शकले नाही.*

### “ ठाकरेंच्या फोनवर काय म्हणाले जरांगे

*उद्धव ठाकरे यांचा फोन आल्याचे मला कळाले, पण माझे त्यांच्याशी काही बोलणे झाले नाही. मी रॅलीत असल्याने गाडीच्या वरती आहे, गाडीमध्ये माझा फोन आहे. त्यामुळे, माझी त्यांच्याशी चर्चा झाली नाही. उद्धव ठाकरेंनी संभाजीनगर येथे जे दोन मुद्दे मांडले, त्या दोन्ही मुद्द्यांशी मी सहमत नसून या ओबीसी नेत्यांसोबत का बसायचे, जाती जातीत भांडण लावले या लोकांनी, त्यांच्यासोबत का बसायचे, असे जरांगे यांनी म्हटले आहे. तसेच, सरकारला फक्त ओबीसींचा प्रश्न मांडायचा, सोडवायचा आहे आमचा नाही. त्यामुळे, ते यासाठी कशाला फोन करतील असेही जरांगे यांनी म्हटले.*

### चकमकीत ६ दहशतवादी ठार

जम्मू : जम्मू–काश्मीरच्या राजौरी येथील भारतीय लष्कराच्या तळावर दहशतवादी हल्ला करण्यात आला. मंजकोट भागातील ग्लुटी गावात लष्कराच्या चौकीवर तैनात असलेल्या जवानावर दहशतवाद्यांनी गोळीबार केला. या गोळीबारात एक जवान जखमी झाला. या गोळीबारादरम्यान सुरक्षा चौकीवर तैनात असलेल्या जवानांनी दहशतवाद्यांवर गोळीबार केला. यावेळी झालेल्या दोन चकमकीत ६ दहशतवादी ठार झाले तर दोन जवान शहीद झाले आहेत. रविवारी पहाटे ३.५० वाजता ही घटना घडली. अंधाराचा फायदा घेत दहशतवादी पळून जाण्यात यशस्वी झाले. दहशतवाद्यांना पकडण्यासाठी लष्कर आणि पोलिसांनी परिसरात शोधमोहीम सुरू केली आहे.

## पोलिसांच्या मोटारसायकलला कारने उडवले, एकाचा मृत्यू, एक जखमी

**नेकनूर । प्रतिनिधी**

पोलीस भरती प्रक्रिया बंदोबस्ता करीता कर्तव्यावर निघालेल्या दोन पोलिसांना नेकनूर जवळील बीड रोडवर मंगल कार्यालया शेजारी कारने समोरुन जोराची धडक दिली. यामध्ये नेकनूरचे रहिवासी आणि सध्या दिंद्रुड येथे कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक मच्छिंद्र श्रीधर नन्नवरे (५७) हे ठार झाले, तर उपनिरीक्षक रमेश नागरगोजे गंभीर जखमी झाले.



पोलीस भरतीच्या कर्तव्यावर जाताना नेकनूर जवळील बीड रोडवर असणाऱ्या मंगल कार्यालय शेजारी दुचाकीवरील एमएच २३ एके ९३९७ दिंद्रुड येथे कार्यरत असलेले नेकनूरचे रहिवाशी पोलीस उपनिरीक्षक मच्छिंद्र श्रीधर नन्नवरे आणि त्यांच्यासोबत असलेले सिरसाळा ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक रमेश धोंडीराम नागरगोजे यांना कार एमएच २३ बीसी २१०८ ने जोराची धडक दिली. यामध्ये दोघेही गंभीर जखमी झाले. सकाळची वेळ असल्याने अनेक नागरिक मॉर्निंग वॉकसाठी या ठिकाणी असल्याने लागलीच नेकनूर पोलिसांना या अपघाताची माहिती देण्यात

◀◀ पान २ वर

## वीज कर्मचाऱ्यांसाठी खुशखबर! तीनही कंपन्यांच्या वेतनात मोठी वाढ



**मुंबई । प्रतिनिधी**

**ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या वीज कंपन्यांतील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या मूळ वेतनात १९ टक्के आणि सर्व भत्त्यांमध्ये २५ टक्के वाढ देण्यात येत असल्याची माहिती उमुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.**

सह्याद्री अतिथीगृह येथे ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित या वीज कंपन्यांतील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वेतन पुनर्निर्धारण करण्याबाबत बैठकीत देवेंद्र फडणवीसांनी याची माहिती दिली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित या तिन्ही वीज कंपनीच्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्या मूळ वेतनात मध्ये १९ टक्के व सर्व भत्त्या मध्ये २५ टक्के वाढ देण्याचे मान्य केले आहे. तसेच सहाय्यकांना परिविक्षाधीन कालावधी करता पाच हजार रुपयांची वाढ आणि तांत्रिक

◀◀ पान २ वर

## चारधाम यात्रा स्थगित, उत्तराखंडमध्ये पावसाचा रेड अलर्ट

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

उत्तराखंडमध्ये रविवारी (७ जुलै) भारतीय हवामान विभागाने पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांनी चारधाम यात्रा तात्पुरती स्थगित केली आहे. याबाबतचे वृत्त पीटीआयने दिले आहे. रविवारी आणि सोमवारी उत्तराखंडच्या गढवाल भागात अतिवृष्टीचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. यामुळे गढवालचे आयुक्त विनय शंकर पांडे यांनी सांगितले

◀◀ पान २ वर

भुमी पुत्राचा
भव्य सत्कार सोहळा

• सत्कारमुर्ती •
शेतकरीपुत्र मा.बजरंग (बप्पा) मनोहर सोनवणे
खासदार, बीड लोकसभा

• कार्यक्रमाचे अध्यक्ष •
मा.श्री.अशोक शंकरराव पाटील माजी मंत्री महाराष्ट्र राज्य

• प्रमुख अतिथी •
मा.श्री.संदिप भैय्या क्षिरसागर – आमदार, विधानसभा बीड
मा.श्री.पृथ्वीराज साठे – मा.आमदार, केज विधानसभा
मा.श्री.रत्नाकर (आप्पा) शिंदे – जिल्हाप्रमुख, शिवसेना उबाठा
मा.डॉ.नरेंद्र काळे – प्रदेशाध्यक्ष, डॉक्टर सेल रा.काँ.प.श.प.
मा.श्री.आप्पासाहेब जाधव – केज तालुकाप्रमुख, शिवसेना उबाठा
मा.श्री.प्रविण खोडसे – केज तालुकाध्यक्ष, काँग्रेस
मा.श्री.अंगद इंगळे – अध्यक्ष, सरपंच संघटना, केज
मा.श्री.महेबुब भाई शेख – युवा प्रदेशाध्यक्ष, रा.काँ.प.श.प.
मा.श्री.कालिदास अपेट – कार्याध्यक्ष, शेतकरी संघटना, म.रा.
मा.श्री.बालासाहेब जाधव – मा.सभापती, पं.स.केज
मा.श्री.राजासाहेब (पापा) देशमुख – मा.सभापती, पं.स.केज
मा.सौ.संजिवनीताई देशमुख – महिला कार्याध्यक्ष, रा.काँ.प.श.प.
मा.श्री.सय्यद साजेद अली – जेष्ठ नेते, रा.काँ.पा.श.प.
मा.श्री.नामदेव (बप्पा) गायकवाड – केज तालुकाध्यक्ष, शिवसंग्राम
मा.डॉ.अशोकरावजी थोरात – सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा मुंबई
मा.श्री.राजेसाहेब देशमुख – जिल्हाध्यक्ष, काँग्रेस
मा.प्रा.हनुमंत भोसले – सामाजिक कार्यकर्ते
मा.श्री.श्रीधर (बाबा) भवर – कळंब तालुकाध्यक्ष, रा.काँ.प.श.प.
मा.श्री.पशुपतीनाथ दांगट – मा.उपनगराध्यक्ष, न.पं.केज
मा.श्री.शंकर जाधव – केज तालुकाध्यक्ष, रा.काँ.प.श.प.
मा.श्री.अमर (भैय्या) देशमुख – अंबाजोगाई तालुकाध्यक्ष, रा.काँ.प.श.प.

• स्वागताध्यक्ष •
मा.श्री.शिवाजी (बंडु) चौधरी मा.श्री.भाई मोहन गुंड

• प्रमुख उपस्थिती •
मा.श्री.दत्तात्रय (पिंटु) ठोंबरे – व्हा.चेअरमन, खरेदी विक्री संघ
मा.श्री.उमाकांत भुसारी – मा.पं.स.सदस्य,केज
मा.श्री.महादेव आबा लाड – अध्यक्ष, वकील महासंघ, केज
मा.शमशोद्दीन इनामदार – मा.सरपंच, केज
मा.श्री.युवराज (दादा) गोरे – मा.जि.प.सभापती, बीड
मा.श्री.गोविंद कणसे – अध्यक्ष, सराफ असोसिएशन
मा.श्री.लालासाहेब वायबसे – चेअरमन, राजर्षी शाहु पत संस्था
मा.श्री.कुलदिप करपे – अध्यक्ष, शेतकरी क्रांती मोर्चा
मा.श्री.अभय कुलकर्णी – अध्यक्ष, सक्रीय पत्रकार संघ
मा.श्री.अजय भांगे – अध्यक्ष, विश्वगामी पत्रकार संघ
मा.श्री.सुरेश तात्या पाटील – मा.जि.प.सदस्य, बीड
मा.श्री.प्रेमचंद कोकाटे – मा.पं.स.सदस्य,केज
मा.श्री.युवराज (दादा) काळे – मा.सरपंच, केज
मा.श्री.प्रकाश कामाजी – अध्यक्ष, रोटरी क्लब केज
मा.श्री.उत्तम आप्पा मस्के – जेष्ठ नागरिक
मा.श्री.तस्लिम इनामदार – महिला तालुकाध्यक्ष, रा.काँ.प.श.प.
मा.सौ.शितलताई लांडगे – महिला तालुकाध्यक्ष, बजरंग बप्पा मित्र मंडळ
मा.श्री.विकास आप्पा मिरगणे – अध्यक्ष, कृषी
मा.श्री.नंदकुमार मोरे – अध्यक्ष, झुंजार पत्रकार संघ
मा.श्री.बाबासाहेब मस्के – अध्यक्ष, संघर्ष पत्रकार संघ
मा.श्री.बालासाहेब बोराडे – चेअरमन, खरेदी विक्री संघ
मा.श्री.महेश गायके – सरपंच, राम वडगांव
मा.कबिर इनामदार – मा.नगराध्यक्ष, न.पं.केज
मा.श्री.महादेव सुर्यवंशी – अध्यक्ष, व्यापारी महासंघ, केज
मा.श्री.दिलीप (आबा) गुळभिले – संचालक, खरेदी विक्री संघ
मा.हाजी अमजद खतीब – आदर्श शिक्षक
मा.श्री.नसरिन बागवान – जिल्हा संघटक, रा.काँ.प.श.प.
मा.श्री.अशोक सोनवणे – अध्यक्ष, आदर्श पत्रकार संघ
मा.श्री.रंजीत घाडगे – अध्यक्ष, पुरोगामी पत्रकार संघ
मा.श्री.चंद्रकांत पाटील – अध्यक्ष, स्वाभिमानी पत्रकार संघ

विनीत: मा.खा.बजरंग बप्पा सोनवणे मित्र मंडळ, केज तालुका
• सोमवार दि.8 जुलै 2024 • वेळ: सकाळी 11.00 वा.
स्थळ: विठाई मंगल कार्यालय, धारुर रोड, केज जि.बीड

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.६ जुलै २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : २२.५० क्विंटल | २,३०१ | ३,१०० | २,६९३ |
| ज्वारी/हायब्रिड :२०.५० क्विंटल | २,३८० | २,७१८ | २,५२९ |
| मूग : १.०० क्विंटल | ७,२७६ | ७,५०१ | ७,३८८ |
| तूर : २.५० क्विंटल | ९,४०० | १०,४०१ | ९,९०० |
| उडीद :०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| बाजरी: २८.५० क्विंटल | २,४०० | २,७०० | २,५७८ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ११७.५० क्विंटल | ४,००१ | ४,५०० | ४,३२५ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |

# आयुष्यमान योजनेत मोठ्या बदलाची नांदी

## ५ नाही आता १० लाखांचे विमा कवच




**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

मोदी सरकार तिसऱ्या कार्यकाळातील पहिले बजेट २३ जुलै २०२४ रोजी सादर करणार आहे. या पूर्ण अर्थसंकल्पाकडून प्रत्येकाला काही ना काही अपेक्षा आहे. देशात लोकसभेचा निकाल सर्वांनाच माहिती आहे. त्यातच आता चार राज्यांच्या निवडणुका पुढ्यात येऊन ठेपल्या आहेत. त्यामुळे लोकाभिमूख योजनांसाठी सढळ हाताने पैसै खर्च करणे आवश्यक आहे. त्यामुळे पंतप्रधान जन आरोग्य योजना

◀◀ पान २ वर

### “ प्रस्तावाला अंतिम स्वरुप

*येत्या तीन वर्षांत – अंतर्गत लाभार्थी संख्या दुप्पट करण्यावर भर देण्यात येऊ शकतो. त्यामुळे देशातील दोन तृतीयांश पेक्षा अधिक लोकसंख्येला थेट फायदा होईल. या वृत्तानुसार, उपचारासाठी देशातील मोठी लोकसंख्या कर्जाच्या विळख्यात अडकत असल्याचे कारण समोर येत असल्याने सरकार त्यांना मोठा दिलासा देण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे विमा कव्हरेजची रक्कम ५ लाखांहून १० लाख रुपये करण्याचा गांभीर्याने विचार होत आहे.*

### “ सरकारच्या तिजोरीवर पडणार भार

*केंद्र सरकार या महिन्याच्या अखेरीस २३ जुलै रोजी पूर्ण अर्थसंकल्प सादर करणार आहे. या बजेटमध्ये विमा क्षेत्रातील या मोठ्या निर्णयाची घोषणा होऊ शकते. जर आयुष्यमान भारत योजनेतंर्गत विमा रक्कम वाढविण्याचा निर्णय जाहीर झाला तर सरकारच्या तिजोरीवर १२,७०६ कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडेल. ७० वर्षांवरील नागरिकांसह या योजनेत जवळपास ४–५ कोटी लाभार्थी सहभागी होतील, असा अंदाज आहे.*

cmyk

## अग्रलेख

# ‘एक देश एक कर’ ही शुद्ध धूळफेक ठरलीय!

भारतीय कररचनेतील महत्त्वपूर्ण सुधारणा ही वस्तु व सेवाकर-जीएसटीच्या स्वरुपात राबवली जात आहे. १ जुलै २०१७ रोजी या महत्त्वपूर्ण व धाडसी करसुधारणेस प्रारंभ झाला व आता सात वर्षांची सप्तपदी पूर्ण झाली आहे. केवळ ६ वस्तूवर आकारला जाणारा कर आता अपवादात्मक काही वस्तू व सेवा वगळता सर्वव्यापी झाला असून, त्यातून मिळणारा महसूल प्रतिवर्षी नवे उच्चांक स्थापन करीत आहे. २०२३-२४ या वित्त वर्षात २० लाख कोटींचा करमहसूल गतवर्षीच्या तुलनेत १२ टक्क्यांनी वाढला असून याच काळात राष्ट्रीय उत्पन्न ७ टक्क्यांनी वाढले, याचाच अर्थ कर संकलनाची लवचिकता वाढली असे म्हणावे लागते. दरमहा साधारण दीड ते दोन लाख कोटीचा कर महसूल संकलीत करणारी जीएसटी ही आपली उद्दिष्ट्ये साध्य करू शकली का? तसेच महसूल उत्पन्न वाढीसाठी ज्यांचे महत्त्वाचे योगदान आहे त्यांचे प्रश्न, अडचणी याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत व अपेक्षित आहेत.

मृत्यू आणि कर या दोन गोष्टी अटळ असून जगातील सर्वच देशात प्राचीन काळापासून कर विविध मार्गे वसूल केले जातात. यात उत्पन्न व संपत्तीवर असणारे प्रत्यक्ष कर व वस्तू आणि सेवांवर आकारले जाणारे अप्रत्यक्ष कर असे दोन मुख्य मार्ग असतात. आदर्श कर पद्धतीबाबत जे महत्त्वाचे निकष आहेत त्यामध्ये करपद्धती सोपी असावी, करदात्यास कमीत कमी त्रास असावा, करांचे दर जाचक नसावेत, करमहसूल शासनाला पुरेसा मिळावा, सर्व घटकांवर क्षमतेप्रमाणे व न्याय तत्वानुसार कर आकारणी असावी, असे महत्त्वाचे निकष सूचवले आहेत. करांचे परिणाम उद्योग, व्यापार, उत्पन्न पातळी, तसेच उत्पन्न वाटप किंवा विषमता याच बरोबर उत्पादन रचना यावरही होत असल्याने कार्यक्षम, कालसुंगत कररचना ही विकासाची पूर्व अट ठरते. करमहसुलाच्या दृष्टीने सर्वात सोईस्कर व्यवस्था ही शासनाच्या दृष्टीने वस्तू व सेवावरील कर असतात. यामध्ये करदात्यास आपण कर देत आहोत याची जाणीव होत नाही. कारण तो कर किंमतीमध्ये समाविष्ट असतो. हे कर कोणत्या प्रमाणात असावे, वसुलीचे अधिकार कोणाकडे असावेत. याबाबत नियम, कायदे तयार केले जातात. भारतीय करपद्धती ब्रिटीशांनी तयार केलेल्या मूळ रचनेवर आधारीत असून त्यामध्ये सुधारणा करण्यात आल्या. केळकर समितीने प्रथम जीएसटीची संकल्पना २००० मध्ये मांडली. ही एकात्मिक, सुलभ प्रणाली स्वीकारण्यात येणाऱ्या व्यावहारिक अडचणीवर उपाय शोधत १ जुलै २०१७ मध्ये याचा प्रारंभ झाला. जीएसटीची सुरुवात ज्या उद्दिष्टांसाठी झाली त्यामध्ये ३ महत्त्वाचे घटक होते. त्यात विविध करांचे सुसूत्रीकरण करून करप्रपात परिणाम म्हणजे करांवर कर आकारणी टाळणे, कर विवाद कमी करणे आणि एक देश एक कर प्रस्थापित करणे अशी उद्दिष्टे होती. जीएसटीत काही महत्त्वपूर्ण बदल आवश्यक आणि अपेक्षित आहेत. सध्याचे जीएसटी दर अनेक वस्तू व सेवाबाबत पिळवणूक करणारे असून शालेय वस्तूवर १८ टक्के जीएसटी, आरोग्य सेवा-विमा यावर १८ टक्के जीएसटी समर्थनीय ठरत नाही. कररचना पुनर्रचित करण्यास ७३ टक्के प्रतिसाद आहे. वस्तूवरील कर प्रमाण घटणे व किंमती घटणे हे अनुभवास येत नाही. आदान कर परतावा (आयटीसी) अनेक कारणांनी अडवला जातो, नाकारला जातो ही मोठी तक्रार अनेक उद्योजकांची असून त्या बाबत सुधारणा आवश्यक ठरते. सेवा निर्यात भारताचा महत्त्वाचा व्यापार घटक असून त्याबाबत सवलतीचे धोरण आवश्यक ठरते.

जीएसटी प्रारंभ झाल्यानंतर पहिल्या ३-४ वर्षातील करभरणा करताना झालेल्या चुकावरील दंड ५३ व्या जीएसटी कौन्सीलने माफी दिली असून कर मात्र पूर्णत: मार्च २०२९ पर्यंत भरणे आवश्यक केले आहे. ‘कर विवादसे संवाद’ ही व्यवस्था बळकट करणे, कर भरण्यास सुलभता देणे, अशा सुधारणा जीएसटी २.० नव्या दमाने अखंड भारतीय बाजारपेठ निर्माण करू शकते. जर जीएसटीची उद्दिष्टे कितपत साध्य झाली याचे उत्तर विचारल्यास संमिश्रच दिसते. करांचे एकत्रिकरण, सुलभता वाढली व दुहेरी कर आकारणी अंशत: घटली असे दिसते. कर विवाद घटणे अद्यापि झाले नसून ‘एक देश एक कर’ ही शुद्ध धूळफेक ठरली आहे. केवळ उत्पन्नवाढीचे उद्दिष्ट कर रचनेचे असत नाही. त्याचा व्यापक सकारात्मक परिणाम सर्व सहभागी घटकांच्या सहकार्यातूनच होतो याचे भान अर्थमंत्री २२ जुलैच्या अर्थसंकल्पात घेतील व जीएसटी कक्षेबाहेर असणारे मद्य, पेट्रोल, डिझेल, वीज हे जीएसटी कक्षेत आणतील काय हे पहावे लागेल.

# केंद्रीय मंत्री संदीपान भुमरे यांच्या मुलाच्या कार्यक्रमात बीडच्या राजचा ‘आवाज’

### संदिपान भुमरे यांचे चिरंजीव विलास भुमरे यांच्यावर तयार केलेल्या गीताला प्रचंड प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

**बीडचा उभरता गायक राज प्रल्हाद रायते याची गायकी मधील कारकीर्द दिवसेंदिवस वाढत आहे. संभाजीनगरचे खासदार आणि केंद्रीय मंत्री संदिपान भुमरे यांचे चिरंजीव विलास बापू भुमरे यांच्यावर राज रायते याने गायलेल्या गीताला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. विलास बापू भुमरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने या गीताचे लॉन्चिंग करण्यात आले. यावेळी मंत्री संदीपपान भुमरे यांच्यासह शेकडोंची उपस्थिती होती.**



संभाजीनगर येथे विलास बापू भुमरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला संभाजीनगरचे खासदार मंत्री संदिपान भुमरे यांचीही उपस्थिती होती. या वाढदिवसाच्या कार्यक्रमांमध्ये बीडचा गायक राज प्रल्हाद रायते याने गायलेल्या गीताचे लॉन्चिंग करण्यात आले. विलास बापू भुमरे यांच्यावर आधारित असलेल्या या गीताला या कार्यक्रमात प्रचंड प्रतिसाद मिळाला. जमलेल्या शेकडो रसिकांनी अक्षरशः या गीतावर ताल धरल्याचे दिसून आले. यावेळी मंत्री संदिपान भुमरे, त्यांचे चिरंजीव विलास बापू भुमरे आणि इतर मान्यवरांनी राज याचे तोंडभरून कौतुक केले. सदरील गीत हे प्रल्हाद रायते यांनी रचले असून राज रायते याच्या आवाजात ते पूर्ण करण्यात आले आहे. याला संगीत पवन शिंदे यांचे असून निर्माता अजय धारकर आहेत. संतकृपा व्हिडिओ एडिटिंग यांनी हे गीत शूट केले आहे. राज रायते याने आपल्या गायकी मधून बीडचे नाव राज्यभर केले आहे. यापूर्वीही राज यांनी विविध विषयावरील गाणी गायली आहेत. बीडचे माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्यावरही राजराचे यांनी गीत गायले असून ते प्रचंड लोकप्रिय झालेले आहे. याशिवाय तेली समाजावरील राज यांनी गायलेली गीते अधिक लोकप्रिय झाले असून, ती प्रत्येक कार्यक्रमात वाजवली जात आहेत. वडील प्रल्हाद रायते हे बऱ्याच वेळा गीत लेखन करीत असून, त्यांच्या गीताला योग्य न्याय देण्याचे काम राज याच्याकडून केले जात आहे. त्याच्या रूपाने बीड चे नाव सर्वदूर जात असून, याचे सर्व श्रेय राज हा आई-वडील, परिवारातील सदस्य आणि मित्र परिवाराला देतो.

# पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात शंभू सीमेवरून जनतेसाठी मोफत प्रवासाची मागणी करणारी याचिका

**चंदिगढ । वृत्तसंस्था**

**पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात एक जनहित याचिका (पीआयएल) दाखल करण्यात आली आहे, ज्यात शंभू सीमेवरून सार्वजनिक वाहतूक आणि वाहनांना जाण्यास परवानगी देण्याचे निर्देश मागितले गेले आहेत. पंजाब-हरियाणाला जोडणारा हा रस्ता हरियाणा सरकारने बंद केला आहे.**



एमएसपी हमी कायद्यासह इतर गोष्टींसह फेब्रुवारीपासून शेतकरी आंदोलन करत आहेत. उच्च न्यायालयासमोर प्रलंबित असलेल्या आणखी एका जनहित याचिकामध्ये, न्यायिक चौकशी समितीने शेतकऱ्याच्या मृत्यूच्या निषेधार्थ अंतरिम अहवाल सादर केला आहे. पेशाने वकील असलेल्या वासू रंजन शांडिल्य यांनी शेतकरी आंदोलन सुरू झाल्यापासून सीमा बंद केल्याचा आरोप करत उच्च न्यायालयात धाव घेतली असून, त्यामुळे सर्वसामान्यांची, विशेषत: व्यापारी आणि डिपार्टमेंटल स्टोअर्स मालक आणि रस्त्यावरील विक्रेत्यांची गैरसोय होत आहे. यामुळे स्थानिकांना जीवनावश्यक वस्तू मिळत नाहीत. नवी दिल्लीला पंजाब, हिमाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मीरला जोडत असल्याने एनएच-४४ ही या प्रदेशाची जीवनरेखा मानली जाते, असे सांगून याचिकेत आरोप केला आहे की, ‘‘शेतकऱ्यांनी त्यांचे आंदोलन सुरू केल्यानंतर (एनएच-४४ वर) दीड महिन्यांपूर्वी अंबाला जिल्ह्याच्या सीमेवर शंभू गावाजवळ वाहतूक थांबवली.

याचिकेत असे सादर केले आहे की शंभू सीमेवर फक्त काही शेतकरी बसले आहेत आणि बहुतेक क्षेत्र/रस्ता रिकामा आहे जो हरियाणा सरकारने दोन्ही बाजूंनी सिमेंटच्या बॅरिकेड्सने रोखला आहे. शंभू सीमेवर निमलष्करी दलांसह हरियाणा पोलिसांचे ५०० हून अधिक पोलीस तैनात आहेत, ज्यामुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा आर्थिक बोजा पडतो आहे. आता उच्च न्यायालय काय निर्णय देते याकडे लक्ष लागले आहे.

# दोषींवर कडक कारवाई करा

### हाथरसप्रकरणी राहुल गांधी यांचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना पत्र

**नवी दिल्ली। वृतसंस्था**

**नुकतेच उत्तर प्रदेशातील हाथरस येथील एका बुवाच्या सत्संग कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर लोकांची गर्दी झाली होती. सत्संगाचा कार्यक्रम संपल्यानंतर उडालेल्या गोंधळात झालेल्या चेंगराचेंगरीमुळे जवळपास १२० नागरिकांचा मृत्यू झाला. या मृतकांच्या कुटुबियांना मदत निधीही जाहिर करण्यात आली. तसेच जखमींना उपचार करण्याची घोषणाही उत्तर प्रदेश सरकारने जाहीर केले. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना पत्र लिहिल्याची माहिती राहुल गांधी यांनी एक्स वरून दिली.**

राहुल गांधी यांनी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना लिहिलेल्या पत्रात म्हणाले की, हाथरसमध्ये झालेली घटना दुर्दैवी आहे. या घटनेतील मृत व्यक्ती आणि जखमींच्या कुटुंबियांची भेट घेतली. या कुटुंबियांना भेटल्यानंतर त्यांना दिलासा देण्यासाठी वापरण्यात आलेले सांत्वनपर शब्दही कमी पडत होते. इतके ते नागरिक दु:खी आणि कष्टी झाल्याचे पाह्यला मिळत होते, अशी भावनाही यावेळी व्यक्त केली. राहुल गांधी पुढे आपल्या पत्रात म्हणाले की, राज्य सरकारने यापूर्वीच मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना मदत जाहिर केली. तर जखमींवरील उपचाराची जबाबदारीही घेतली आहे. मात्र मृतकांच्या कुटुंबियांना जाहिर करण्यात आलेली रक्कम अत्यंत तोकडी असून त्यात आणखी वाढ करण्याची गरज आहे. तसेच जखमींवर चांगल्यातील चांगले रूग्णालयात उपचार मिळतील त्या अनुषंगाने आणखी प्रयत्न करावेत अशी सूचनाही यावेळी केली. राहुल गांधी पुढे म्हणाले की, हाथरसमधील घटना दुर्दैवी आणि दु:खदायक आहे. त्यामुळे पुन्हा अशा स्वरूपाच्या घटना घडू नये यासाठी काही धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या गर्दीच्या घटनांना जबाबदार असणाऱ्या स्थानिक प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवरही करावाई करावी अशी मागणी करत दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणीही मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना पाठविलेल्या पत्रातून गांधी यांनी केली.

# अखेर संभाजीनगरचे राजू शिंदे भाजपातून उबाठात

### उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत बांधले शिवबंधन

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून छत्रपती संभाजी नगर येथील भाजपाचे स्थानिक पातळीवरील नेते राजू शिंदे भाजपा सोडून शिवसेना उबाठात प्रवेश करणार असल्याचे बोलले जात होते. त्या अनुषंगाने अखेर राजू शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेना उबाठा पक्षात प्रवेश केला. यावेळी राजू शिंदे यांच्यासोबत त्यांच्या समर्थकांनीही उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना उबाठात प्रवेश केला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी राजू शिंदे यांच्यासह इतर प्रमुख समर्थकांच्या हाती शिवबंधन बाधत पक्षात प्रवेश केल्याचे जाहिर केले. राज्यात आणि केंद्रात भाजपाचे सरकार असूनही स्थानिक पातळीवर भाजपामधून शिवसेना उबाठा पक्षात जाहिर प्रवेश करणारे राजू शिंदे हे मराठ्यातील कदाचित पहिलेच नेते असतील. यापूर्वी जळगावचे भाजपा आमदार उमेश पाटील यांनीही ऐन लोकसभा निवडणूकीच्या तोंडावर भाजपासोडून शिवसेना उबाठा पक्षात प्रवेश केला. दरम्यान, राजू शिंदे यांनी भाजपा सोडू नये यासाठी भाजपामधील अनेक नेत्यांनी त्यांच्याशी प्रत्यक्ष तर फोनद्वारे संपर्क साधून पक्ष न सोडण्याबाबत सूचना केली. मात्र राजू शिंदे हे आपल्या शब्दावर ठाम राहिले. राजू शिंदे यांच्या पक्ष प्रवेशानंतर शिवसेना उबाठा नेते चंद्रकांत खैरे यांनीही राजू शिंदे हे लोकसभा निवडणूकीत आले असते तर संदीपान भूमरे यांना मिळालेली मते मला मिळाली असती आणि माझा विजय झाला असता असे सांगितले.

# शेतकरी पुत्रांचे आमरण उपोषण सातव्या दिवशी स्थगित

### दुधाला हमीभाव देण्यासाठी पावले उचलण्याचे विखे पाटलांचे आश्वासन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

**दुधाला ४० रुपये हमीभाव मिळावा या मागणीसाठी अकोले तालुक्यातील गणोरे गावात शुभम आंबरे आणि संदिप दराडे या शेतकरी पुत्रांचे गेल्या सात दिवसांपासून आमरण उपोषण सुरु होते. आज दुग्ध विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मध्यस्थीनंतर त्यांनी उपोषण स्थगित केले. दुधाला हमीभाव देण्यासाठी पावले उचलण्याचे आश्वासन विखे पाटील यांनी दिल्यानंतर उपोषणकर्त्यांनी आपले उपोषण स्थगित केले.**

या आंदोलनाबाबत राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, दुधाच्या व्यवसायात अनिश्चितता आहे. जागतिक बाजार पेठेत भुकटीचे भाव पडल्याने निर्यात बंद आहे. मागणीपेक्षा दुधाचे उत्पादन जास्त आहे. अनेक कारणांनी दुधाचे भाव कोसळले आहेत. त्यामुळे राज्य सरकारने अनुदानासह ३५ रुपये भावाचा निर्णय घेतला आहे. हमीभावासाठी केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. दुधासाठी एमएसपी कायदा करण्याची मागणी केल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

### तीन दिवसांपासून निलेश लंकेंचे आंदोलन सुरु

तर, कांदा आणि दुधाला योग्य भाव मिळावा, या मागणीसाठी खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे शेतकरी जनआक्रोश आंदोलन तीन दिवसांपासून सुरु आहे. अहमदनगरचे जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ यांनी शेतकऱ्यांच्या भावना समजून घेण्यासाठी आंदोलनस्थळी यावं, अशी भूमिका खासदार निलेश लंके यांची आहे. निलेश लंके यांच्या आंदोलनावर नगरचे पालकमंत्री आणि दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मोठे वक्तव्य केले आहे. आवश्यकता वाटल्यास निलेश लंके यांच्याशी चर्चा करण्याची माझी तयारी असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# केजरीवालांच्या वैद्यकीय तपासणीवेळी पत्नीला परवानगी नाकारली

**नवी दिल्ली। वृतसंस्था**

**तुरुंगात असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या वैद्यकीय तपासणीच्या वेळी त्यांच्या पत्नीला उपस्थित राहता येणार नाही, असे राऊस अव्हेन्यू न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे अरविंद केजरीवाल यांना पुन्हा एक झटका बसला आहे. अरविंद केजरीवाल तुरुंगात असताना त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल तेव्हा त्यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल यांना उपस्थित राहण्याची परवानगी द्यावी, अशी याचिका केजरीवाल यांनी दाखल केली होती.**

केजरीवाल यांच्या याचिकेवर सुनावणी करताना राऊस एव्हेन्यू न्यायालयाने सांगितले की, ‘‘तुरुंगाच्या नियमांच्या विरोधात जाऊन अरविंद केजरीवाल यांना तशी सुविधा देण्याचे कोणतेही कारण नाही. अरविंद केजरीवाल यांच्यासारख्या तुरुंगातील इतर अनेक कैद्यांवरही आजारावर उपचार सुरू आहेत. आणि त्यापैकी कोणालाही सहकारी ठेवण्याची परवानगी देण्यात आलेली नाही.‘‘ त्यामुळे सुनिता केजरीवाल अरविंद केजरीवाल यांच्या वैद्यकीय तपासणी वेळी उपस्थित राहू शकणार नाहीत. मात्र, न्यायालयाने सुनीता केजरीवाल यांना वैद्यकीय मंडळाला भेटण्याची परवानगी दिली आहे. तसेच केजरीवाल यांचे सर्व वैद्यकीय अहवाल सुनीता केजरीवाल यांना देण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.

# मुस्लिम तरुणाई माजी मंत्री क्षीरसागर यांच्या सोबतीला

**बीड । प्रतिनिधी**

**येत्या विधानसभेच्या निवडणुका तोंडावर असतानाच बीड शहरात काही नगरसेवक आणि मुस्लिम समाज माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना पाठिंबा देण्यासाठी आणि हात बळकट करण्यासाठी सोबत येऊ लागला आहे. रविवारी इस्लामपुरा बाबा चौक येथील सय्यद मोहसीन यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह प्रवेश करून माजी मंत्री क्षीरसागर यांना येत्या निवडणुकीत विजयी करण्याचा निश्चय केला आहे.**



आगामी विधानसभा निवडणुका काही महिन्यांवर येऊन ठेपल्या आहेत बीड शहरातील अनेक जण माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना पाठिंबा देत प्रवेश करू लागले आहेत इस्लामपुरा बाबा चौक येथील सय्यद मोहसीन, शेख रईस, सय्यद जायद, सय्यद जिशान, सय्यद वसीम, फरविद लाला, सय्यद मुजाहेद, सय्यद समीर, सय्यद सलीम यांनी कार्यकर्त्यांसह रविवारी प्रवेश केला. माजी नगरसेवक मुखीद लाला यांच्या पुढाकारातून झालेल्या या प्रवेश सोहळ्यात माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी सर्व तरुणांचे स्वागत केले. यावेळी सय्यद मोहसीन यांनी प्रवेशाबाबत बोलताना सांगितले की, आम्ही इस्लामपुरा भागातील समस्या आणि प्रश्न ज्यांच्याकडे मांडत होतो त्यांनी दुर्लक्ष केले, आमच्या भागात अनेक प्रलंबित कामे होती हे प्रश्न सोडवण्यासाठी खूप प्रयत्न केले. नगरसेवक मुखिद लाला यांच्या माध्यमातून आम्ही अण्णासाहेब यांच्याकडे गेलो तेव्हा काही प्रश्न मार्गी लागले, अण्णांची काम करण्याची पद्धत आम्हाला आवडली आमच्या वार्डातील समस्या सुटत असतील तर आम्ही अण्णांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार आहोत. अण्णांनी मुस्लिम समाजाला न्याय देण्याच्या भूमिकेतून काम केले असून २०१९ ला आमची मोठी चूक झाली असे असले तरी अण्णांनी आमचे प्रश्न सोडवले ही बाब आमच्यासाठी खूप महत्त्वाची ठरली अण्णा आणि आमच्यात आता कुठलाही स्पीड ब्रेकर नाही अण्णांनी आणलेल्या कामावर सेल्फी काढणार्यांना येत्या विधानसभा निवडणुकीत नक्कीच आम्ही त्यांची जागा दाखवून असे ते म्हणाले. यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, येणारा दिवस हा चांगला असावा अशी सर्वांची अपेक्षा असते प्रचंड उत्साह आणि जोश कार्यकर्त्यांमध्ये आहे गेल्या निवडणुकीत काय झाले हे सर्वांनी बघितले निवडणुकीत जी आश्वासने दिली गेली ती पूर्ण झाली नाहीत. त्यामुळे आता हेच मतदार जागृत झाले आहेत शेवटी पदाचा उपयोग हा जनतेसाठी करावा लागतो तरच जनता साथ देत असते समाजासाठी आपली बांधीलकी सोडू नये तुमचा उत्साह निवडणुकीत कायम ठेवा अफवांवर विश्वास ठेवू नका विकासाची कामे कुणामुळे आली हेही लक्षात ठेवा आगामी काळात आपल्या समाजासह सर्वच समाजाला न्याय देण्याच्या भूमिकेत आपण राहणार असल्याचे ते म्हणाले. यावेळी कार्यकर्त्यांनी प्रचंड जल्लोष करत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना निवडून आणण्याचा निर्धार केला.

## पान १वरून...

### उध्दव ठाकरे शेतकऱ्यांच्या

माहिती या महिलेने दिली. शिवसेना या मुलाच्या शिक्षणाची जबाबदारी घेणार असल्याचा विश्वास उद्धव ठाकरे यांनी त्या महिलेला यावेळी दिला. उद्धव ठाकरे यांच्यासोबत शिवसेना नेते विनायक राऊत, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, चंद्रकांत खैरे, सचिव मिलिंद नार्वेकर, उपजिल्हाप्रमुख अशोक शिंदे, तालुकाप्रमुख आनंद भालेकर, मनोज पेरे आदी उपस्थित होते.

------------

### मराठ्यांना त्रास देणाऱ्या

स्थानिकांशी संवाद साधला. यावेळी मनोज जरांगे म्हणाले, सर्व पक्षाच्या मराठा नेत्यांना माझी विनंती आहे. पक्षांचा ऐकून मुलांची माती करू नका. मी निष्ठा सोडणार नाही, सरकारला मॅनेज होणार नाही. माझी तुमच्याकडून अपेक्षा एकजूट मोडू देऊ नका. तुम्हाला हात जोडून विनंती ओबीसींच्या लोकांवर हात उगरू नका. ओबीसी ना ही विनंती मराठ्यांच्या अंगावर जाऊ नका. मात्र ओबीसी नेत्यांना पाडा मराठ्यांनी एकजुटीने मतदान केले तर जातीवादी म्हणता. तुम्ही एकजुटीने मागणी केली. मतदान केले आम्ही कधी तुम्हाला जातीवादी म्हणलो नाही. मी माझ्या समाजासाठी कट्टर आहे, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. तसेच मराठा समाजाला त्रास देणाऱ्या ओबीसी नेत्यांना विधान सभेला पाडा असे थेट आवाहन मराठा समाजाला मनोज जरांगे यांनी परभणीच्या सभेतून केले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा ओबीसी-मराठा वाद चिघळण्याची शक्यता आहे.

-----------

### चारधाम यात्रा स्थगित, उत्तराखंडमध्ये

की, यात्रेकरूंच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून चारधाम यात्रा पुढे ढकलण्यात आली आहे. ‘गढवाल विभागात ७ आणि ८ जुलै रोजी मुसळधार पावसाचा हवामान विभागाने दिलेला अंदाज पाहता, सर्व भाविकांना ७ जुलै रोजी ऋषिकेशच्या पलीकडे चारधाम यात्रेला न जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे,’’ असे विनय शंकर पांडे यांनी म्हटले आहे. यात्रेकरूंना प्रतिकूल हवामानाच्या परिस्थितीत पुढील प्रवास सुरू करण्यापूर्वी हवामान सुरळीत होईपर्यंत प्रतीक्षा करावी, असा सल्ला त्यांनी दिला आहे.

------------

### वीज कर्मचाऱ्यांसाठी खुशखबर!

कर्मचारी यांना मिळणारा ५०० रुपयांचा भत्ता १००० रुपया इतका करण्यात आला आहे. या बैठकीस ऊर्जा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव आभा शुक्ला, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार या तिन्ही कंपन्याचे वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी, तसेच संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

----------------

### पोलिसांच्या मोटारसायकलला कारने

आली. नेकनूर पोलीस स्टेशनचे सपोनि चंद्रकांत गोसावी यांनी अपघातस्थळी धाव घेत तात्काळ दोघांना बीडला हलवले. मात्र गंभीर जखमी मच्छिंद्र नन्नवरे यांचे वाटेतच निधन झाले. तर नागरगोजे यांच्यावर बीड येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. एअर बॅग उघडल्याने कारचालक बचावला. त्याने लागलीच घटनास्थळावरून पळ काढला. नन्नवरे हे नेकनूर येथे आपल्या गावी आले होते. वर्षभरातच ते पोलीस खात्यातून सेवानिवृत्त होणार होते. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

----------

### आयुष्यमान योजनेत

आणि आयुष्यमान भारत योजना विषयी मोठी अपडेट समोर येत आहे. एका वृत्तानसुार, केंद्र आयुष्यमान भारत योजनेचे विमा कवच मर्यादा ५ लाखांहून अधिक करण्याच्या तयारीत आहे. एका वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, एनडीए सरकार आयुष्यमान भारत-पंतप्रधान जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या आणि विमा रक्कम वाढविण्याचा विचार करत आहे. सूत्रांच्या माहिती आधारे दिलेल्या वृत्तानुसार, लाभार्थ्यांना देण्यात आलेली विमा रक्कम मर्यादा आता ५ लाखाहून १० लाखांपर्यंत वाढविण्याचा विचार करण्यात येत आहे. एनडीए सरकार येत्या तीन वर्षांत आयुष्यमान भारत स्वास्थ्य विमा योजनेतंर्गत लाभार्थ्यांची संख्या दुप्पट करण्यावर भर देण्यात येणार आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. ०८ जुलै २०२४
३

## ऊसतोड मजुराच्या खून प्रकरणात तिघे जेरबंद

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील बोरखेड येथील तरूणाचा मृतदेह लिंबागणेशपासून जवळच असलेल्या महाजनवाडी फॉरेस्ट लगतच्या शिवरस्त्याच्या कडेला काल आढळून आला होता. पैशाच्या वादातून त्या मजुराचा खून करण्यात आला. यातील तीनही आरोपीना अखेर स्थानिक गुन्हे शाखा व नेकनूर पोलिसांनी २४ तासाच्या आत ताब्यात घेतले आहे.

शिवाजी पवार,बाबू फुलचंद काळे,उमेश शिवाजी पवार या तीन आरोपीना स्थानिक गुन्हे शाखेने साकत (ता. जामखेड. जि. अहमदनगर) मधून अटक केली आहे. शिवाजी पवारला कालच पोलिसांनी ताब्यात घेतले होते. तर आज उमेश आणि बाबूला ताब्यात घेण्यात आल्याचे कळते.इस्माईल सत्तार तांबोळी (वय ३२, रा.बोरखेड, ता. बीड) या ऊसतोड कामगाराची पैशाच्या वादातून हत्या करण्यात आली होती. देवाण-घेवाणीतून झालेल्या वादात वरील तिघांनी इस्माईलची हत्या केली होती. पोलीस तपासातून ही बाब समोर आल्यानंतर तीन ही आरोपीना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली नसीर शेख,राजू पठाण,अतुल हराळे यांनी ताब्यात घेतले.सध्या तीन ही आरोपीना नेकनूर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी पुढील तपास करीत आहेत.

# राज्यातील जन्म-मृत्यू नोंदीची वेबसाईट २० दिवसांपासून बंद

## पाल्यांच्या शैक्षणिक प्रवेशासाठी पालकांची एकच तारांबळ

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राज्यातील शासनाची जन्म-मृत्यू नोंदीची वेबसाईट गेल्या २० ते २५ दिवसांपासुन बंद असल्याने शैक्षणिक प्रवेशासाठी पालकांची तारांबळ उडाली असून शासनाने ही वेबसाईट लवकर पुर्ववत करावी अशी मागणी नागरिकांतून होवू लागली आहे. ही वेबसाईट बंद असल्यामुळे अनेक पाल्यांना यावर्षीच्या शैक्षणिक प्रवेशापासुन वंचित रहावे लागेल की काय ? अशीच शंका उपस्थित होऊन पालकांच्या जीवाची घालमेल होऊ लागली आहे. येथील नगर परिषदेच्या जन्म मृत्यू विभागात शेकडो नागरिक हेलपाटे मारताना दिसून येत आहेत.

राज्य शासनाने राज्यभर जन्म-मृत्यूच्या नोंदीत होणारी अनियमितता टाळून यामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी पुर्वीची सीआरएस ही पोर्टल साईट बंद केली असून आता नव्याने डीसीसीआरएस नविन पोर्टल सुरू केले आहे. हे पोर्टल एवढे किचकट आहे की, जन्माची नोंद ज्या रूग्णालयातून आली आहे. त्या नोंदीचा पुरावा, आई-वडीलांचे आधार व अर्ज या पोर्टलवर अपलोड करावे लागणार आहेत. ते केल्यानंतर त्याची शहाणीशा जिल्हा कार्यालयात झाल्यानंतरच त्याचे प्रमाणपत्र वेबसाईटवर अपलोड केले जाणार आहे.

सध्या या पोर्टलवर काम सुरू असल्याने ते अतिशय धिम्या गतीने सुरू आहे. या पोर्टलची सविस्तर माहिती ऑपरेटर किंवा त्या विभागाच्या कर्मचाऱ्यांना अवगत नसल्यामुळे त्यांच्याकडून प्रमाणपत्र देण्यासाठी मोठया प्रमाणावर अडचणी निर्माण होत आहेत. विभागाच्या या तांत्रिक अडचणीमुळे नागरिकांना विनाकारण त्रास होऊन त्याच्या पाल्यांच्या जन्माचा दाखला

मिळविण्यासाठी मोठी तारांबळ उडाली आहे. ही वेबसाईट गेल्या २० ते २५ दिवसांपासुन बंद असल्याने पालक शासकीय रूग्णालय व नगर पालिका कार्यालयात हेलपाटे मारत त्या त्या कार्यालयाचे उंबरे झिजवताना दिसून येत आहेत. अंबाजोगाई शहरातील स्वाराती रूग्णालयाने तर पालकांचे अर्ज घेणेच बंद केले आहे तर नगर परिषद कार्यालयाने विभागाची वेबसाईट बंद असल्याने प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होईल असे भित्तिपत्रच लावले आहे. या बाबत रूग्णालय प्रशासनाशी आमच्या प्रतिनिधीने चर्चा केल्यानंतर शासनाची वेबसाईटच बंद असल्याने अर्ज घेणे बंद केले आहे. शासनाचे हे पोर्टल सुरूळीत चालु झाल्यानंतर नागरिकांना प्रमाणपत्र वाटप करण्यात येतील असे त्यांच्याकडून सांगण्यात आले. नगर पालिका प्रशासनाने या बाबत प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करून देखील वरिष्ठांकडून या वेबसाईटचे अपग्रेडेशन सुरू असल्याचे सांगण्यात आले. जुन महिना संपुन जुलै महिना उजाडला तरी राज्यातील कित्येक पालकांना शाळेत प्रवेश घेण्यासाठी जन्माच्या दाखल्याची आवश्यकता असून यासाठी प्रशासनाच्या दारामध्ये रांगाच्या रांगा लागत आहेत. तेव्हा प्रशासनातील कर्मचार्यांना आलेल्या नागरिकांना उत्तर देताना त्यांची दमछाक होत आहे. नागरिकांची हेळसांड तथा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने ही वेबसाईट तात्काळ सुरूळीत करून नागरिकांना न्याय द्यावा अशी मागणी मोठया प्रमाणात होत आहे.

### शासनाकडे याचा पाठपुरावा सुरू

शासनाने जन्म-मृत्यू नोंदीसाठी डीसीसीआरएस नविन पोर्टल सुरू केले आहे. मागच्या २० ते २५ दिवसांपासुन हे पोर्टल बंद असून हे पोर्टल लवकर सुरू करून नागरिकांच्या अडचणी दुर कराव्यात अशा मागणीचा पत्र व्यवहार वरिष्ठांकडे केला असून ही वेबसाईट सुरूळीत झाल्यानंतर सर्व पालकांचे प्रमाणपत्र लगेच वितरित केले जातील.

– रमाकांत सोनकांबळे (जन्म-मृत्यू विभाग प्रमुख न.प.अंबाजोगाई)



# पावसाची हुलकावणी,शेतकऱ्याचे डोळे आभाळाकडे

नागनाथ वारद । अंबाजोगाई

अनेक दिवस उलटून गेले अंबाजोगाई तालुक्यात पावसाने हुलकावणी दिली आहे.त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.ज्या शेतकऱ्यांनी पेरणी केली त्या शेतकऱ्यांना बियाणे उगवण्याची तर न पेरणाऱ्या शेतकऱ्यांना पेरणीयोग्य पाऊस कधी पडेल याची चिंता लागली आहे.

तालुक्यातील बऱ्याच क्षेत्रावर पेरणी झाली आहे. त्यात सर्वाधिक पेरा सोयाबीनचा झाला असल्याचे सांगण्यात येते. मध्यंतरी झालेल्या पावसाने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. तात्काळ उघडीप मिळाल्याने घाईघाईत पेरणी करून घेतली. मात्र आता नुसते वारेच सुटल्याने पेरलेलेही उगवते की नाही याची चिंता लागली आहे. तर ज्या शेतकऱ्यांनी पेरणी केली नाही, असे शेतकरी मोठ्या पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. पावसाने ओढ दिल्याने पेरणीचा हंगाम लांबला आहे. पहिल्या पावसात शेतकऱ्यांनी खते, बियाणे खरेदी करून ठेवले. मात्र, पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत. आतापर्यंत झालेल्या पेरणीत मोठ्या टक्केवारीत सोयाबीनचा पेरा झाला आहे. उर्वरित क्षेत्रावर तर सोयाबीनशिवाय इतर पिक घेणे कठीण होणार आहे.

पेरण्याच खोळंबल्या



तालुक्यातील काही ठिकाणी तुरळक पाऊस झाला त्यातच शेतकऱ्यांनी शेतीची मशागत पुर्ण करून पेरण्याही उरकल्या आता पाऊस पडतो याची वाट बघत आहे. पावसाने दडी मारल्याने शेतकरी वर्ग चिंतातूर झाला असून खरीप हंगामात काही ठिकाणी पेरण्या झाल्या आहेत तर अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पेरण्या पूर्णपणे खोळंबल्या आहेत. वरूणराजाच्या आगमनास होत असलेला विलंब व भूगर्भातील पाणी पातळी दिवसेंदिवस कमी होत चालल्याने उन्हाळी पिकांच्या वाढीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होऊ लागला आहे.

जुलै महिन्याचा पहिला आठवडा संपला तरी पावसाच्या आगमनाची साधी चाहूल नाही. गतवर्षी चांगला पाऊस झाल्याने पाण्याची कमरता जाणवली नाही. हवामान खात्याने यंदा जाहीर केलेल्या अंदाजाने शेतकरी सुखावला होता. थोडक्या पावसाने जमीन ओली केली मात्र आता पावसाने दडी मारल्याने या पिकास पाणी कमी पडू लागले पेरलेले उगवेल काय यामुळे शेतकरी चिंतातुर आहे. गेली दोन वर्षे खरिपाच्या पेरणीसाठी वेळेवर पाऊस झाला होता. यामुळे पैसे देणारे पीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोयाबीनचा पेरा जास्त क्षेत्रावर झाला आहे गेली दोन वर्षे समाधानकारक पाऊस झाल्याने भूगर्भातील पाणी पातळीत वाढ झाली होती. त्याचा परिणाम विहीर बागायत क्षेत्रातदेखील ऊसाची लागवड

मोठ्या प्राणावर झाली आहे. मात्र, आता पावसाने ओढ दिल्याने या पिकास पाणी कमी पडू लागले आहे. जिल्ह्यात काही ठिकाणी बऱ्यापैकी ऊसाची लागवड असल्याने त्यांची मदार विहिरीच्या पाण्यावर असते. मात्र आता पाऊस लांबल्यामुळे विहीरीचे पाणी पिकाला पुरेनासे झाले आहे. आता चांगला पाऊस झाल्यासच उर्वरीत खरिपाची पेरणी होऊ शकेल. असा अंदाज शेतकरी वर्गातून व्यक्त होतआहे.



## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील ६५ वर्षे वयाची अट शिथिल करा-ज्येष्ठ नागरिक संघाची मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

माझी लाडकी बहीण योजनेत समाविष्ट लाभार्थी महिलांसाठी असलेली ६५ वर्षे पर्यंत असलेली अट शिथिल करण्यात यावी अशी मागणी जेष्ठ नागरिक संघाच्या वतीने एका बैठकीत नुकतीच करण्यात आली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही महत्वकांक्षी योजना असून या योजनेद्वारे अर्थिक दुर्बल घटकातील महिला भगिनींना दीड हजार रुपयाचे मासिक अर्थसाह्य मिळणार आहे त्यामुळे त्यात पात्र असणाऱ्या महिलांनी जरूर याचा लाभ घेतला पाहिजे असे मत अनेक ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केले त्याचबरोबर पात्र महिलांसाठी जी ६५ वर्षे वयोगट ही अट आहे ती अट शासनाने शिथिल करावी कारण ६५ वर्षाच्या नंतर ती योजना बंद होईल मग तिने जगावे कसे हा प्रश्न तिच्या समोर राहील यामुळे ती महिला जिवंत असेपर्यंत त्यांना या योजनेचा लाभ मिळावा अशी मागणी करण्यात आली.यावेळी जेष्ठ नागरिक संघांचे सदस्य बाबुराव बाभुळगांवकर यांच्या वाढदिवसा निमित्याने त्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी अध्यक्ष ड.अनंतराव जगतकर,डॉ.दामोधर थोरात, सुहास काटे, मणिकराव बावणे, पद्माकर सेलमोकर, जगदीश जाजु,बाबुराव बाभुळगावकर, पुंडलिक पवार,शिवाजीराव शिंदे, बालासाहेब आगळे आदी उपस्थित होते.

## भगवानगडावरील माऊलींच्या मंदिरासाठी लालाची पाडळी ग्रामस्थांची १ कोटी १६ लाख रुपये देणगी

**२६ कोटींचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन**

**भगवानगड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या २६ कोटी रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात. श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे लालाची पाडळी येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही १ कोटी १६ लाख रुपये झाली.

नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. या भव्य दिव्य मंदिरासाठी लागणारा खर्च अंदाजे २६ कोटी रूपये इतका आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून सुदामती गुट्टेंचे नाव आघाडीवर

परळी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वसर्वा शरदचंद्रजी पवार साहेबा बरोबर एकनिष्ठ म्हणुन परिचित असलेल्या परळी विधानसभा मतदारसंघातील माजी राज्य उपाध्यक्षा तथा सामाजिक कार्यात नेहमी अग्रस्थानी ओळखल्या जाणाऱ्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांची परळी विधान सभेच्या उमेदवारीसाठी नाव आघाडीवर असल्याचे संकेत कार्यकर्ते बोलुन दाखवत आहेत.



अगदी सुरवाती पासुनच राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या व शरदचंद्रजी पवार साहेबांच्या एकनिष्ठ कार्यकर्ता राहिल्या आहेत.शरदचंद्रजी पवार साहेबांचे पुरोगामी विचार व पक्षाचे ध्येयधोरण तळागाळातील शेतकरी शेतमजूर व वंचित पिडीता पर्यंत पोहचविण्याचे कार्य सातत्याने सौ.गुट्टे यांच्याकडून राबविण्यात येते.स्वताकतीवर शेतकरी, शेतमजूर,वंचित घटकांना मदत करत आपले हे राजकीय व सामाजिक कार्याचा व्रतअंगी जोपासत आहेत.या भागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काम करत असताना त्यांच्या उसाचा प्रश्न अथवा पिकविमा,दुष्काळी अनुदान मिळवण्यासाठी प्रशासनाला धारेवर धरुन प्रश्नांची सोडवणूक करुन घेतात याच बरोबर गेली काही वर्षापासून या भागातील साखर कारखाने कधी बंद तर कधी चालू अश्या परिस्थितीत होते.अश्या प्रसंगी उस उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले होते.या शेतकऱ्यांच्या मदतीला कोणताही कारखाना किंवा नेता मदतीला आला नाही शेतकऱ्यांचा उस कारखान्याला गेला पाहिजे म्हणून स्वतः गाड्या,उस तोडणीचे कोयते देऊन या भागातील उस साखर कारखाण्याला पाठवुन शेतकऱ्यांच्या या संकटसमयी धावुन गेलेले पुर्ण मतदारसंघाला माहिती आहे.

पान ६ वरून...

### ज्ञानोबा तुकाराम जयघोष

पालखी रथाची मिरवणूक काढण्यात आली.यंदा पाऊस नसल्याने वारकरी मोठ्या प्रमाणावर वारीसाठी निघाले आहेत.दिंडीस निरोप देण्यासाठी माजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, उपसभापती नामदेव धोंडे,सरपंच युवराज पाटील,उपसरपंच दीपक कर्डीले,हनुमानशेठ बिहाणी,ह.भ.प.दादा महाराज चांगुणे,सर्व ग्रा.पं सदस्य,सुभाष सोनवणे, रामशेठ मधुरकर,माजी सरपंच अनिलतात्या ढोबळे,माजी सभापती संजयनाना ढोबळे,गोरख कर्डीले,पत्रकार उत्तम बोडखे, रघुनाथ कर्डीले, विनोद ढोबळे,राजेश राऊत, ह.भ.प.दादा महाराज चांगुणे,पांडुरंग कर्डीले,योगेश भंडारी मोहनदास बिहाणी,रवींद्र ढोबळे, गोरख कर्डीले, सुरेश कर्डीले,शिवाजी कर्डीले, बजरंग कर्डीले, विकास धर्माधिकारी, दत्ताभाऊ सायकड, सुभाष रासकर भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेरी बु.येथे पांडुरंग नाथ यांच्यावतीने दिंडीतील वारकऱ्यांना भोजन देण्यात आले तर कडा येथे बबलू तांबोळी यांच्यावतीने नाश्त्याची सोय करण्यात आली होती.आष्टी तालुक्यातील कडा येथील संत मदन महाराज संस्थानची आषाढीनिमित्त पंढरपूरसाठी दिंडी रविवार दि.७ जुलै रोजी कडा येथुन निघाली आहे.कडा येथील संत मदन महाराज संस्थानची दरवर्षी आषाढी एकादशीनिमित्ताने संत मदन महाराज बिहाणी देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल यांच्या नेतृत्वाखाली पंढरपूरला दिंडी जात असते.

दिंडीचे हे २१ वे.वर्ष आहे शेरी,धिर्डी,शिराळ, मिरजगाव,करमाळा, टेंभुर्णी,विठ्ठल साखर कारखाना मार्गे पंढरपूरला ही दिंडी पोहोचते.दिंडीत मोठ्या संख्येने भाविक सहभागी झालेले आहेत.वाटेत ठिकठिकाणी दिंडीच्या वारकऱ्यांची जेवण वगैरेची सोय कडा व परिसरातील नागरिकांनी केली आहे.संस्थानचा पंढरपूर येथे मठ असून त्याठिकाणी ही दिंडी चार दिवस मुक्कामी राहते.

### पी एम किसान योजनेच्या लाभार्थ्यांना

असल्याचा आरोप शेतकऱ्यातून होत होता तसेच तालुका कृनि अधिकारी व माजलगाव कृषी कार्यालयातील अधिकारी हे कागदोपत्री खेळ करत आहेत म्हणून शेतकरी संताप व्यक्त करीत होते. म्हणून भाई थावरे यांनी या मागणी संदर्भात शासन स्तरावर आवाज उठवण्यासाठी येथील कृषी कार्यालयास कुलूप ठोकण्याचा इशारा दिला होता त्यानुसार त्यांनी दि ०७ जुलै रविवार रोजी कृषी कार्यालयास शेकडो शेतकऱ्यांच्या कुलूप ठोकून आपली मागणी शासन दरबारी मांडून अधिकाऱ्याचे डोळे उघडण्याचे काम केले.यानंतर कृषी कार्यालयाने पी एम किसान योजना आमच्याकडे वर्ग करण्यात आली असून आमच्याकडे अपुरा कर्मचारी वर्ग आहे तसेच आम्ही आमच्याकडे आलेले सर्व अर्ज मंजुरीसाठी तहसील कार्यालयाकडे पाठवले असले तरी त्यांच्याकडून अध्याप आम्हाला मंजुरीचे पत्र आलेले नाही याबाबतीत आम्ही प्रयत्न करून अर्ज निकाली काढण्याचे आश्वासन दिले यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले असले तरी येत्या पंधरा तारखेपर्यंत वरील मागण्या मान्य न झाल्यास बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा भाई ठावरे यांनी दिला आहे तसेच खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांना एक निवेदन देऊन या मागणीचा पाठपुरावा करण्यासाठी वरिष्ठ पातळीवर बैठक बोलविण्यात येऊन हा प्रश्न सोडवण्याची विनंती करण्यात आली आहे.

## तंत्रशिक्षण मंडळाच्या उन्हाळी परीक्षेत टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकचे घवघवीत यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था संचलित, टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकच्या, विद्यार्थ्यांनी उन्हाळी परीक्षा - २०२४ मध्ये झालेल्या परीक्षेत पॉलिटेक्निकच्या निकालाची परंपरा कायम ठेवत घवघवीत यश संपादन केले. कॉम्प्यूटर इंजिनीअरींग शाखेचा निकाल शंभर टक्के इलेक्ट्रीकल इंजिनीअरींग शाखेचा निकाल ९५ टक्के, मेकॅनिकल इंजिनिअरींग शाखेचा निकाल ७५ टक्के एवढा लागला आहे. तर कॉम्प्यूटर इंजिनीअरींग शाखेतून तृतीय वर्षाचा विद्यार्थी ओम संजय बुरांडे या विद्यार्थ्यांने ९४.४७ टक्के गुण मिळवून महाविद्यालयातून प्रथम क्रमांक मिळविला आहे.

कॉम्प्यूटर इंजिनीअरींग शाखेतील तृतीय वर्षात प्रियंका मुरलीधर मुंडे (९१.१८ टक्के), मानसी ज्ञानेश्वर जगताप (८९.२० टक्के), द्वितीय वर्ष कॉम्प्यूटर शाखेतून अभिषेक सखाराम सुरवसे (९१.०७ टक्के), स्नेहल सुधाकर पवार (८८.१३ टक्के), अंजली सुधीर गवळी (८५.४७ टक्के), प्रथम वर्ष कॉम्प्यूटर इंजिनीअरींग क्षितिजा आत्माराम आगळे (९१.५३ टक्के), ज्ञानेश्वरी धनंजय सामसे (९०.२४ टक्के), अनुजा बालासाहेब खरबडे (८७.७७ टक्के), तृतीय वर्ष इलेक्ट्रीकल इंजिनीअरींग शाखेतून विश्वजीतसिंग नंदकुमार ठाकुर (९२.५० टक्के), मनीर जगदीश चौधरी (९०.७५ टक्के), अभिषेक हरिदास वांडरे (८८.५० टक्के), द्वितीय वर्ष इलेक्ट्रीकल इंजिनीअरींग शाखेतून मुक्ता परमेश्वर बीडगर (८४.६७ टक्के), साहील सिराज बागवान (८४.५३ टक्के), ओम अंकुश भगत (८३.६० टक्के), प्रथम वर्ष इलेक्ट्रीकल इंजिनीअरींग अर्पिता सतिश हर्नावळ (९०.४७ टक्के), पांडूरंग प्रेमराज पवार (८१.१८ टक्के), कृष्णा गोविंदराव यादव (७५.७७ टक्के), तृतिय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरींग या शाखेतून अभिषेक श्रीकांत पुजदेकर (७५.११ टक्के), द्वितीय वर्ष मेघराज राजकुमार साठे या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. तसेच गणित विषयात प्रथम वर्षातून १०० पैकी १०० गुण मिळविणारे विद्यार्थी क्षितीजा आत्माराम आगळे, समाधान अर्जुन छात्रे, ज्ञानेश्वरी धनंजय सामसे, पांडूरंग प्रेमराज पवार, अनुजा बालासाहेब खरबडे, अर्पिता सतिश हर्नावळ, तनुजा बालासाहेब खरबडे या विद्यार्थ्यांनी सर्व विषयांत जास्त गुण घेवून विशेष प्राविण्य मिळविले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनिल मिटकरी, खजीनदार विजय रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदिपकुमार दिंडीगावे, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी, कार्यवाहक प्राचार्य डॉ.एन.ए.रावबावले, तंत्रनिकेतनचे प्राचार्य लक्ष्मीकांत बगले, विभागप्रमुख डॉ.व्हि.एस.राजमाने, डॉ.व्हि.व्हि.येरीगिरी, प्रा.सुशिल कुलकर्णी, प्रा.एस.ए.बिराजदार, लेखापाल आर.डी.कस्तुरे, एस.पी.मुंदडा, एम.पी.जोशी, तंत्रनिकेतनचे विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले.

दोन नवीन अभ्यासक्रमास मंजुरी

टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निक येथे शैक्षणिक वर्ष २०२४ पासून दोन नवीन अभियांत्रिकी अभ्यासक्रमास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ए.आय.सी.टी.ई.नवी दिल्ली या संस्थेद्वारे मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून स्थापत्य अभियांत्रिकी (सिव्हिल इंजिनिअरींग - ६०) व अनुविद्यूत संगणक अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स एॅण्ड कॉम्प्यूटर इंजिनिअरींग - ६०) या दोन नवीन अभ्यासक्रमांना मंजूरी मिळाली आहे. सध्या या महाविद्यालयात कॉम्प्यूटर इंजिनिअरींग, इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग, मेकॅनिकल इंजिनिअरींग १६५ विद्यार्थी क्षमतेसह अभ्यासक्रम सुरू आहेत. त्यात या दोन अभ्यासक्रमांची भर पडल्यामुळे प्रवेश क्षमता २८५ एवढी झाली आहे. त्यामुळे परिसरातील व ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना हे नविन अभ्यासक्रम शिकून त्यांचे इंजिनिअर होण्याचे स्वप्न पूर्ण करता येणार आहे.

# अस्मानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांची पीकविमा कंपनीकडून थट्टा

## हजारो शेतकऱ्यांच्या खात्यावर अगदी तुटपूंजी रक्कम

अकोला : 'भिक नको, पण कुत्रं आवर' अशी सांगण्याची वेळ आलीये राज्यातील शेतकऱ्यांवर अन हे म्हणावं लागतंय राज्यातील पीकविमा कंपन्यांना. पीकविमा कंपन्यांनी राज्यातील हजारो शेतकऱ्यांच्या खात्यावर अगदी तुटपूंजी रक्कम जमा केलीये. त्यामुळे एकीकडे अस्मानी संकटात सापडलेल्या शेतकर्यांची पीकविमा कंपनीकडून मदत तर दूरच मात्र उलट थट्टाच केली जात असल्याचे चित्र आहे. एकट्या अकोला जिल्ह्यातल्या अनेक गावांत शेतकऱ्यांना अवघे १००, २००, ५०० रूपयांची नुकसान भरपाई देण्यात आलीये. त्यामुळे शेतकर्यांच्या मनात या पीकविमा कंपन्यांविरोधात प्रचंड संतापाची लाट उसळली आहे. परिणामी, प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी आता पीडित शेतकर्यांकडून जोर धरू लागली आहे.

पीकविमा कंपनीकडून हजारो शेतकऱ्यांची थट्टा

अकोला जिल्ह्यातील म्हैसांग या गावातील रहिवासी असलेले शेतकरी आकाश पिपरे यांच्या बाबतीत देखील असाच काहीसा प्रकार घडला आहे. या आठवड्यात आकाश यांच्या खात्यात पीकाच्या नुकसान भरपाईची रक्कम जमा झालीय. आधीच दुबार पेरणीची चाहूल लागल्याने पिकविम्याच्या भरपाईकडे डोळे लावून बसलेल्या आकाशच्या पायाखालची जणू वाळूच सरकलीय.




कारण, त्याच्या हाती आलेले रक्कम आहे फक्त १८९ रूपये. त्याला २० हजारांपर्यंत भरपाई मिळण्याची अपेक्षा होती. यावर्षी फेब्रुवारीत झालेल्या अवकाळी आणि गारपीटीनं त्याच्या रब्बीतील हरभरा पिकाचं मोठं नुकसान झालं होतं. त्यामुळे त्याला एक शेवटची आस होती ती पिक विम्याच्या भरपाईतून फाटलेल्या संसाराला थिगळ लागण्याची. तर दुसरीकडे अशीच स्थिती झालीय मुर्तिजापूर तालूक्यातील राजूरा सरोदे गावातील शेतकरी रियाजुद्दीन सय्यद यांची. त्यांच्या माथीही विमा कंपनीने मारलेत फक्त ५८३ रूपये. त्याच्या दोन एकरातील हरभरा नुकसानीसाठी त्याला मिळायला हवे होते २३, ३२८ रूपये. मात्र इथे देखील पीकविमा कंपनीकडून मदत तर दूरच, मात्र उलट शेतकर्यांची थट्टाच केली जात असल्याचे चित्र आहे.

अन्? पीकविमा कंपन्यांनी ओरबाडलं तर सांगायचं कुणाला? : या संपूर्ण प्रकरणावरून आता राजकीय वातावरण तापायला सुरूवात झालीये. काल स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं जिल्ह्यातील पिडीत शेतकऱ्यांना सोबत घेत अकोल्याच्या कृषी अधिक्षक कार्यालयात ठिय्या मांडलाय. विमा कंपन्यांकडून शेतकर्यांवर अन्याय झाल्याची अप्रत्यक्ष कबुली कृषी विभागानं दिलीये. यासंदर्भात सरकार आणि विमा कंपन्यांना परिस्थितीची माहिती दिल्याचं कृषी विभागाचे म्हणणं आहे. 'नवऱ्यानं मारलं अन पावसानं झोडपलं तर सांगायचं कुणाला? अशी म्हण ग्रामीण भागात आहे. अगदी तसंच 'अस्मानानं मारलं, सुल्तानानं झोडलं, अन्? पीकविमा कंपन्यांनी ओरबाडलं तर सांगायचं कुणाला? सरकार या पीकविमा कंपन्यांच्या कारभाराला चाप लावणार का?, हाच खरा प्रश्न आता शेतकऱ्यांना पाडला आहे. त्यामुळे आता या प्रकरणी प्रशासन नेमकी काय पाऊले उचलतंय हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# यंदा खरीप कांद्याच्या लागवडीखालील क्षेत्रात वाढीचा अंदाज

पुणे : कृषी मंत्रालयाने राज्य सरकारांच्या सहयोगाने केलेल्या मूल्यांकनानुसार, कांदा, टोमॅटो व बटाटा या भाज्यांच्या लागवडीखालील क्षेत्रात गेल्या वर्षीच्या तुलनेत लक्षणीय वाढ दिसून आली आहे. यंदा मौसमी पाऊस योग्य वेळेत चांगला सुरू झाल्यामुळे खरीप हंगामातील पिकांनी जोर धरला आहे. त्यामध्ये कांद्यासह टोमॅटो आणि बटाट्याचाही समावेश आहे.



रब्बी हंगामात कांद्याचे उत्पादन गेल्या वर्षीच्या तुलनेत काहीसे कमी झाले असले तरीही देशांतर्गत बाजारपेठेत कांद्याची उपलब्धता पुरेशी आहे. कांद्याचे पीक तीन हंगामात घेतले जाते; मार्च ते मे हा रब्बी हंगाम, सप्टेंबर ते नोव्हेंबर खरीपाचा आणि जानेवारी, फेब्रुवारी म्हणजे उशिराचा खरीप हंगाम.

पैकी रब्बी हंगामात एकूण उत्पादनाच्या ७०% कांद्याचे उत्पादन होते तर, खरीप व उशिराच्या खरीप हंगामात मिळून ३०% उत्पादन होते. रब्बी आणि खरीपाच्या सर्वोच्च उत्पादनाचा काळ यांच्या दरम्यान येणाऱ्या कमी उत्पादनाच्या महिन्यांमध्ये कांद्याचा दर स्थिर ठेवण्यात खरीपाचा कांदा महत्त्वाची भूमिका बजावतो. कांद्याचे सर्वोच्च उत्पादन घेणारे राज्य असलेल्या कर्नाटकात १.५० लाख हेक्टर क्षेत्रावर कांद्याच्या लागवडीचे उद्दिष्ट असून त्यातील ३०% क्षेत्रावर लागवड पूर्ण झाली आहे. इतर मोठ्या कांदा उत्पादक राज्यांमध्येही लागवडीचे प्रमाण चांगले आहे. सध्या बाजारात उपलब्ध असलेला कांदा २०२४ च्या रब्बी हंगामातील असून यंदा मार्च ते मे या कालावधीत गोळा केलेला आहे. २०२४ च्या रब्बी हंगामातील १९१ लाख टन कांदा निर्यातीवर दरमहा १ लाख टनाची मर्यादा कायम ठेवल्यास देशांतर्गत बाजारपेठेतील सुमारे १७ लाख टनाची मासिक मागणी पूर्ण करण्यासाठी पुरेसा आहे. रब्बी हंगाम सुरू असताना व त्यानंतर रब्बीचे उत्पादन गोळा करताना यंदा हवामान कोरडे राहिल्यामुळे साठवणीत कांद्याचे नुकसान कमी करण्यास मदत झाली आहे.

शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात घेतलेला कांदा बाजारात आणल्यामुळे एकीकडे कांद्याची वाढलेली उपलब्धता आणि दुसरीकडे, मौसमी पावसाला सुरुवात झाल्यामुळे हवेतील आर्द्रतेत झालेली वाढ यामुळे साठवणीतील कांद्याचे नुकसान होण्याची शक्यता वाढली आहे. परिणामी कांद्याचे दर स्थिरावत आहेत.

# मोसंबी फळगळीची विविध कारणे आणि उपाय

मोसंबीच्या अंबिया बहाराची फळगळ ही एक मोठी समस्या मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांसमोर मागील पाच वर्षांपासून निर्माण झाली आहे. यंदा तर जुलैच्या सुरुवातीलाच मोसंबीची फळगळ सुरू झाली आहे.

मोसंबी फळगळ होण्याची कारणे : पावसाळ्यात जमिनीत सतत पाणी साचून राहल्याने झाडाच्या मुळ्यां कुजतात, मुळ्यांना प्राणवायू अल्प किंवा मिळत नसल्याने फळांवर त्यांचा परिणाम होऊन ती पिवळी होऊन गळून पडतात.

बुरशीजन्य फळगळ - बुरशीजन्य फळगळ प्रामुख्याने फायटोप्थोरा, कोलेटोट्रीकम, डिप्लोडिआ व ऑल्टरनेरिया या बुरशीमुळे होते. या बुरशीचे संक्रमण फळांवर होऊन आर्थिक नुकसानकारक फळगळ आढळून येते.

किटकजन्य फळगळ - फळझाडांवर प्रादुर्भाव करणाऱ्या फळमाशी तसेच रस शोषक पतंगामुळे फळगळ दिसून येते.

असे करा एकात्मिक व्यवस्थापन : शेतातील पाणी बाहेर काढावे, पाणी साचून राहिल्यास बागेमध्ये तणनाशकाचा वापर टाळावा. गळून पडलेल्या फळांना खोल खड्यात दाबून त्यांची विल्हेवाट लावावी. एनएए १ ग्रॅम (१० पीपीएम) किंवा २-४ डी १.५ ग्रॅम (१५ पीपीएम) किंवा जिब्रेलिक ॲसिड १.५ ग्रॅम (१५ पीपीएम) सह एन एटीसीए (४ पीपीएम) (१० पीएम) १ ग्रॅम + ब्रासिनोलाइड (४ पीपीएम) ०.४ ग्रॅम + फॉलिक ॲसिड (१०० पीपीएम) १० ग्रॅम + १०० लिटर पाण्यामध्ये मिसळून १५ दिवसाच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. सूक्ष्म अन्नद्रव्ये झिंक सल्फेट ५ ग्रॅम, फेरस सल्फेट १ ग्रॅम व बोरॉन १ ग्रॅम प्रति लिटर पाणी घेऊन अंबिया फळांकरिता ऑगस्ट- सप्टेंबर महिन्यात तसेच मृगाच्या फळाकरिता ऑक्टोबर- नोव्हेंबर मध्ये फवारणी करावी.






### महत्वाच्या घटना

१४९७ : वास्को द गामा युरोपातुन भारताच्या पहिल्या थेट सफरीवर निघाला.
१८५६ : चार्ल्स बर्न याल 'मशिनगन'चे अमेरिकेतील पेटंट मिळाले.
१८८९ : 'द वॉल स्ट्रीट जर्नल' चा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९१० : स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी 'मोरिया' या जहाजातुन फ्रान्समधील मार्सेल्सच्या समुद्रात उडी घेतली.
१९३० : किंग जॉर्ज (पाचवा) यांच्या हस्ते लंडनमधे ' इंडिया हाऊस'चे उद्घाटन
१९४८ : अमेरिकेच्या वायुसेना दलात महिलांची भारती करण्यात आली.
१९५४ : देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी जगातील सर्वात मोठ्या कालव्यावर भाकरा-नांगल जलविद्युत प्रकल्प सुरु केला.
१९५८ : बर्लिन येथील जागतिक चित्रपट महोत्सवात 'दो आँखे बारह हाथ' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा सन्मान मिळाला.
१९९७ : बिंजिंग येथे झालेल्या आशियाई महिला वेटलिफ्टिंग स्पर्धेत ४६ किलो गटात भारताच्या एन. कुंजुरानी देवीने रौप्यपदक पटकावले.
२००५ : जलवायू परिवर्तन मुद्यावर जी-८ देशांनी आपली सहमती दर्शवली.
२००६ : मुख्य निवडणूक आयुक्त असताना केलेल्या कामगिरीबद्दल टी. एन. शेषन यांना 'रॅमन मॅगसेसे पुरस्कार' जाहीर
२०११ : नवीन चिन्ह असलेली नाणी प्रथमच चलनात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८९ : ग्रँट डफ मराठ्यांचा इतिहास लिहीणारा ब्रिटिश अधिकारी (मृत्यू: २३ सप्टेंबर १८५८)
१८३१ : कोकाकोला चे निर्माते जॉन पंबरटन यांचा जन्म. (मृत्यू: १६ ऑगस्ट १८८८)
१८३९ : जॉन डेव्हिसन रॉकफेलर रॉकफेलर घराण्यातील पहिला उद्योगपती, स्टँडर्ड ऑईल उद्योगसमूह व अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतील पहिल्या तेल उद्योगाचा संस्थापक (मृत्यू: २३ मे १९३७)
१८८५ : ह्यूगो बॉस चे स्थापक ह्यूगो बॉस यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑगस्ट १९४८)
१९१४ : ज्योति बसू प. बंगालचे मुख्यमंत्री (मृत्यू: १७ जानेवारी २०१०)
१९१६ : गो. नी. दांडेकर साहित्य अकादमी पुरस्कार विजेते मराठी लेखक, इतिहासकार व 'गडसम्राट', 'पवनाकाठचा धोंडी', 'जैत रेजैत' या त्यांच्या कादंबर्यांवर चित्रपट निघाले. (मृत्यू: १ जून १९९८)
१९२२ : अहिल्या रांगणेकर मार्क्सवादी कम्युनिस्ट नेत्या (मृत्यू: १९ एप्रिल २००९)
१९४९ : वाय. एस. राजशेखर रेड्डी आंध्रप्रदेशचे १४ वे मुख्यमंत्री (मृत्यू: २ सप्टेंबर २००९)
१९५८ : प्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री नितू सिंह यांचा जन्मदिन.
१९७२ : सौरव गांगुली भारताचा क्रिकेट कर्णधार

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९८४ : कविवर्य बा. भ. बोरकर ऊर्फ 'बाकीबाब' कवी, कादंबरीकार आणि लघुनिबंधकार (जन्म:३० नोव्हेंबर १९१०)
१९८४ : पद्मश्री विजेते गोमंतकीय कवी 'बाकीबाब' उर्फ बाळकृष्ण भगवंत बोरकर यांचे निधन. (जन्म: ३०नोव्हेंबर १९१० )
१९९४ : किम सुंग (दुसरे) उत्तर कोरियाचे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १५ एप्रिल १९१२)
२००१ : तबला विभूषण उस्ताद बाबासाहेब मिरजकर यांचे कोल्हापूर येथे निधन (जन्म:)
२००३ : ह. श्री. शेणोलीकर संतसाहित्याचे अभ्यासक
२००६ : प्रा. राजा राव तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक व लेखक, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते (१९६४), त्यांना 'न्यूस्टाड्ट' या साहित्यातील आंतरराष्ट्रीय पारितोषिकाने गौरवण्यात आले होते (१९८८). (जन्म: ५ नोव्हेंबर १९०८)
२००७ : भारताचे वे८ पंतप्रधान चंद्रा शेखर यांचे निधन. (जन्म: १ जुलै १९२७)
२००८ : महाराष्ट्र भूषण पुरस्कार लाभणारे डॉ. नारायण विष्णू तथा नानासाहेब धर्माधिकारी यांचे निधन.
२०१३ : भारतीय लेखक सुन्द्री उत्तमचंदानी यांचे निधन. (जन्म: २८ सप्टेंबर १९२४)


# कापूस पिकातील रसशोषक किडींचे एकात्मिक नियंत्रण

कापूस पीक पेरणी होऊन १५ दिवसाच्या वर झाले आहे. किंवा काही शेतकऱ्यांची पेरणी अंतिम टप्प्यात असेल. कापूस पिकावर मावा, तुडतुडे, फुलकिडी, पिठ्या ढेकूण यासारख्या रस शोषणाऱ्या किडींचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होऊ शकतो. जाणून घेऊ या कपाशीवरील रसशोषक किडींचे एकात्मिक नियंत्रण.

यांत्रिक पद्धत : शेताचे नियमित निरीक्षण करावे. रसशोषक किडींचा प्रादुर्भाव झालेली गळालेली पाते आणि बोंडे जमा करून नष्ट करावीत. शेताची कोळपणी व खुरपणी किंवा रासायनिक तणनाशकाचा वापर करून पिकाच्या सुरुवातीची ८ ते ९ आठवडे तणांचे व्यवस्थापन करावे. पीक २० दिवसाचे झाल्यावर शेतात पिवळे निळे चिकट सापळे लावावेत. एक हेक्टरसाठी १५ पिवळे व ५ निळे सापळे लावावे.

मशागतीय पद्धती :

नत्र खताचा अतिरिक्त वापर टाळावा.



शिफारशीनुसार दोन ओळीतील व दोन रोपांतील अंतर ठेवावे. मित्र कीटकांचे संवर्धन होण्यासाठी मका, चवळी, उडीद, मूग यासारखी आंतरपिके, मिश्र पिके घ्यावीत. कपाशी पिकाभोवती झेंडू आणि एरंडी या सापळा पिकांची एक ओळ कडेने लावावी.

जैविक पद्धती : ढाल किडा म्हणजेच लेडीबर्ड बीटल या कीटकाचे प्रौढ व त्यांच्या अळ्या प्रामुख्याने मावा किडीवर जगतात. लेडी बर्ड बीटल पुरेशा प्रमाणात आढळून आल्यास रासायनिक कीडनाशकांचा वापर टाळावा.

सिरफीड माशी, पेंन्टाटोमीड ढेकूण, कातीन, भुंगे, ड्रॅगनफ्लाय, रॉबर माशी, गांधील माशी, प्रार्थना कीटक, टॅकनिड माशी इ. मित्र किटकांचे संवर्धन करावे. ५% निंबोळी अर्काची किंवा ॲझाडिरेक्टीन दहा हजार पीपीएम १० मिली किंवा १५०० पीपीएम २५ मिलि प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पिठ्या ढेकणासाठी व्हर्टिसिलीयम बुरशीची ४० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

रासायनिक नियंत्रण पद्धती :

निंबोळी तेल (५%) ५० मिली किंवा फ्लोनीकॅमीड (५०) २ ग्रॅम किंवा डायफेन्थुरॉन (५० ) १२ ग्रॅम किंवा फिप्रोनील ५ एस सी ३० मिली किंवा पायरीप्रोक्झीफेन (५%) + डायफेन्थुरॉन (२५% ) २० मिली वरीलपैकी कोणत्याही किडनाशकांची दिलेल्या प्रमाणात प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.

# रंगीत फुलकोबीची शेती करून कमवा लाखों रुपये



अनेक शेतकरी पारंपरिक पद्धतीने शेती न करता विविध प्रयोग करत आहेत. असाच एक प्रयोग नाशिक मधील एका शेतकऱ्याने केला आहे. त्याने अर्ध्या एकर जमिनीमध्ये वेगवेगळ्या रंगाच्या फुलकोबीचे पीक घेतले आहे. गुलाबी, पिवळा, हिरव्या रंगाची फुलकोबी त्याने घेतली असून त्या शेतकऱ्यास याच चांगला नफा मिळाला आहे. त्याने अगदी प्रमाणात पैशांची गुंतवणूक करून अधिक नफा मिळवला आहे.

कशी केली रंगीत कोबीची लागवड ? : सध्या कमी जागेत रंगीत कोबीची लागवड केली जात असून यास चांगला प्रतिसाद भेटत आहे. बाजारामध्ये यास मागणी देखील होत आहे त्यामुळे अधिक प्रमाणात रंगीत फुलकोबीची शेती करणे फायद्याचे ठरणार आहे. रंगीत फुलकोबीची शेती अगदी कमी गुंतवणूक करून करता येत असून यातून चांगला नफा होतो. फुलकोबीची लागवड साधारणपणे ऑक्टोबर ते नोव्हेंबर या कालावधीत केली जाते, ही फुलकोबी तयार होण्यासाठी ७५ ते ८५ दिवस लागतात. सर्व शेतकरी शेतात अशी रंगीबेरंगी फुलकोबी लावू शकतात. तज्ज्ञांच्या मते, महाराष्ट्रात हा प्रयोग यशस्वीपणे राबवण्यात आला आहे. ते व्हिटॅमिन ए जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करते, त्याला शहरी भागात जास्त मागणी आहे कारण त्यात अधिक पोषक घटक आढळतात.

कमी गुंतवणूक करून मिळवा अधिक नफा : या लागवडीसाठी २५ हजार ते ३० हजार रुपये इतका खर्च येतो. साधारण ३० रुपये किलो एवढा दर मिळतो. मुंबईत याला सर्वाधिक मागणी आहे. अशा रंगीबेरंगी फुलकोबीची लागवड केल्यास शेतकऱ्यांना नक्की फायदा होईल.

# मासिक आणि ग्रामसभा न घेतल्याने अखेर कायद्याने हिसका दाखविला

## पुसऱ्याचा 'ग्रामसेवक' शासकिय सेवेतून निलंबीत

वडवणी

तब्बल एक वर्षात कुठलीच मासिक किंवा ग्राम सभा घेतली नाही तसेच अन्य ग्रामपंचायतीच्या कारभारात मनमानी करणे यांचा ठपका ठेवत खुद्द सदस्याच्या तक्रारीवरुन तात्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांच्या सही पत्राने पुसरा ग्रा.प.तीचे ग्रामसेवक बी.एम. भुजबळ यांना कायद्याचा हिसका दाखवत शासकिय सेवेतून निलंबन करण्यात आले आहे.

वडवणी तालुक्यतील पुसरा गांवची ग्रामपंचायत वादात सापडली आहे. सदरील निलंबन आदेशात असे म्हटले आहे कि, ग्रामसेवक बी.एम भुजबळ यांनी दि. १ जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ अखेर ग्रा.प. मध्ये कुठलीच मासिक व ग्रामसभा घेतली नाही. याबाबत ग्रामसेवक यांनी टाळाटाळ केली आहे. कुणालाही विचारत न घेता परस्पर शासकिय कागदपत्रावर सह्या करणे, सदस्यांना विचारत न घेता कोरम पुर्ण न करता ग्रामसभा घेणे असा ठपका ठेवला आहे. तर याबाबत पं. स. कार्यालयाने ग्रामसेवक भुजबळ यांना दि. १६/०१/२०२४, दि. ०१/०३/२०२४, दि. १२/०३/२०२४ व दि. २०/०३/२०२४ या तारखेला पत्र देवूनही मासिक सभा व ग्रामसभा बाबतचे चौकशी कामी अभिलेखे व खुलासा सादर केलेला नाही. म्हणून ग्रामसेवक बी. एम. भुजबळ यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चा भंग केला असल्याने नियम १९६४ मधील,नियम ३ (१) तरतुदीनुसार जि.प. सेवेतून ग्रामसेवक भुजबळ यांना निलंबीत करण्याचा आदेश जि. प. तात्कालीन मुख्य कार्यकारी आधिकारी अविनाश पाठक यांच्या सही पत्राने केला आहे. भुजबळ यांना निलबंन काळात शासनाच्या आधिन राहून पाच नियम घालून दिले आहेत. असे पत्रात नमूद करण्यात आले असून लोकनियुक्त ग्रा.प. मधील कारभार देखील नि;पक्षपाती न केल्यास निलंबनाची कार्यवाही होऊ शकते. असाच या निर्णयावरुन दिसून येते असून या निलंबन कार्यवाहीमुळे तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

### माहिती देण्यास उशीर का?

याबाबतची माहिती घेण्यासाठी जवळपास दहा दिवसांपुर्वी वडवणी पं.स. गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांच्याशी संपर्क केला होता. त्यावेळी त्यांनी अस्थापन विभागातील म्हेत्रे यांच्याशी बोला त्यांना आदेशाची प्रत द्यायला सांगतो असे सांगितले यानंतर त्यांच्याशी संपर्क साधला आसता ते म्हणाले कि, मी रजेवर आहे. उद्या आँफीसला या देतो, पुन्हा आँफीसला भेट दिली आँफीसमध्ये म्हेत्रे दिसून आले नाहीत. पुन्हा भ्रमणध्वनीद्वारे संपर्क केला आसता दुसरेच कुणी बोलत होते. यानंतर पुन्हा बीडिओ नागरगोजे यांच्याशी याबाबत माहिती द्या असे विचारल्यावर उद्या या माहिती देतो, पुन्हा उद्या फोन करुन विचारले तर म्हेत्रे आँफीसला आले आहेत. त्यांना सांगतो त्यांच्यशी बोला असे म्हणाले यात बुधवार उजडला आणि पुन्हा म्हेत्रे यांच्याशी संपर्क साधून विचारले आसता म्हणाले कि, माझ्या मेव्हणाचे लग्न आहे. सोमवारी आँफीसला या, कपाट्याच्या चाव्या माझ्या जवळ आहेत. अस म्हणत वेळ भागवत असल्याचा प्रकार समजताच रिपोर्टर प्रतिनिधी यांनी प्रश्नाचा भडीमार केल्यानंतर अवघ्या एक मिनीटातच सदरील प्रकरणाचा निलंबीत आदेश व्हाँटसअपवर पाठवला आहे. या प्रकारावरुन असे दिसून येत आहे कि, या कार्यालयातील कुणाचा कुणाला ताळमेळ नसून सर्वच जण एकमेकांचा बचाव करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. असे यावरुन दिसून येत आहे.

### सदस्यांच्या तक्रारावरुन कारवाई

सदरील ग्रा.प. मध्ये एकही मासिक सभा न घेतल्याची तक्रार सहा सदस्यानी दि. ०८ जानेवारी २०२४ रोजी जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात केली होती. यानंतर पं.स. कार्यालयाने ग्रामसेवक भुजबळ यांना चार वेळेस पत्र देवून खुलासा व चौकशी कामी आभिलेख सादर करण्याचे सांगितले होते. तरी पण निरहट्ट ग्रामसेवक भुजबळ याला जुमानले नसल्याने अखेर मुख्य कार्यकारी आधिकारी यांनी अखेर दि.२७ मे रोजी २०२४ रोजी निलंबनाचा आदेश काढून निलंबीत केले आहे.

## शेतकऱ्याची फसवणूक करणाऱ्या कंपनीवर गुन्हे दाखल करा-भाई ॲड.गोले



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथील शेतकरी बाळासाहेब शेंडगे यांनी त्यांच्या दीड एकर सोयाबीन पिकातील तन नष्ट करण्यासाठी अदामा कंपनीच्या शाकेद नावाच्या तणनाशकाची फवारणी केली त्यावेळी दीड एकर जमिनीतील ३० दिवसाचे सोयाबीन पीक जळून पूर्णतः खाक झाले असून पाण्यावर लागवड केलेल्या शेतकऱ्याच्या सोयाबीन पिकाचे दीड लाख रुपयाच्या नुकसानीस अदामा कंपनी जबाबदार आहे.

कंपनीने शेतकऱ्याची फसवणूक करून त्यांच्या सोयाबीन पिकाचे नुकसान केले असल्याने शेतकऱ्याने ०५ जुलै रोजी तालुका कृषी अधिकाऱ्यासह पंचायत समिती, उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय यांना फसवणूक झाल्याबाबत तक्रार दाखल करून न्याय देण्याची मागणी केली असून न्याय न दिल्यास १५ जुलै रोजी आत्मदहनाचा इशारा दिलेला असताना देखील कृषी अधिकारी व कृषी विभाग झोपेचे सोंग घेऊन बसलेले असून आज पावतो शेतकऱ्याच्या झालेल्या नुकसानीची पाहणी कृषी विभागाकडून झालेली नाही त्यामुळे शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी ०७ जुलै रोजी प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची पाहणी केली व कृषी अधिकारी यांनी शेतकऱ्याच्या तक्रारीवरून जायमोक्यावर पंचनामा करून संबंधित आदामा कंपनीवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर जागरण गोंधळ आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, यावेळी शेतकरी बाळासाहेब शेंडगे यांच्यासह परमेश्वर डाके, डॉ. भगवान पाटील, चंद्रकांत धिरडे, योगेश गोळेकर, महेश धिरडे आदी उपस्थित होते.

## थोडक्यात

### आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सुखदेव तोंडे सेवानिवृत्त?

धारूर: सुखदेव तुकाराम तोंडे केंद्रप्रमुख हे त्यांच्या शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. तब्बल ३९ वर्ष त्यांनी शासकीय सेवा दिली. १९८५ साली त्याच्या मूळ गावी सोनीमोहा ता.किल्लेधारूर येथे ते शिक्षक म्हणुन रुजू झाले, याठिकाणी त्यांनी बरीच वर्ष सेवा दिली, त्यानंतर किल्ले धारुर व काठेवाडी येथे मुख्याध्यापक म्हणुन काम पाहिले, पदोन्नती झाल्यानंतर त्यांची सिरसाळा ता.परळी येथे केंद्रप्रमुख म्हणुन नियुक्ती झाली, आणि सध्या ते आडस ता. केज येथे केंद्रप्रमुख म्हणुन काम पाहत होते. कुठलाही गैरमार्ग न वापरता त्यांनी विद्यार्थी घडविण्याचे काम केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी हे त्यांच्या जीवनात यशस्वी झाले. त्याचे मार्गदर्शन खाली घरातील सदस्य उच्चशिक्षित बनले, मुलगा व दोन मुली डॉक्टर आहोत. शेतीची आवड, नातेसंबंध जोपासणे हे त्यांचे छंद आहेत. अत्यंत शांत स्वभाव, मितभाषी व धाडसी असलेल व्यक्तिमत्त्व म्हणजे माझे तोंड त्यांच्या चांगल्या कार्यामुळे त्यांना जिल्हा परिषद बीड ने १९९८ साली आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित केले.

### बालविवाह प्रतिबंधक जनजागृती कार्यक्रम

धारूर: धारूर तालुक्यातील असोला येथील जीवन शिक्षण माध्यमिक विद्यालय असोला विद्यालयात बीड जिल्हा प्रशासन व मनस्वी प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने बालविवाह प्रतिबंधक जनजागृती व पालक मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. बीड जिल्हा हा ऊसतोड कामगारांचा मजुरांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो या जिल्ह्यामध्ये बालविवाहाचे प्रमाण अधिक असले कारणे बालविवाह प्रतिबंध जनजागृती कार्यक्रम होणे गरजेचे असल्याने बीड जिल्हा प्रशासन व मनस्वी प्रकल्प यांच्या अंतर्गत जनजागृती कार्यक्रमाचे मोठे कार्य जिल्ह्यांमध्ये सुरू आहे त्याचाच एक भाग म्हणून धारूर तालुक्यातील जीवन शिक्षण माध्यमिक विद्यालय आसोला विद्यालयात बालविवाह प्रतिबंधक जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी आलेल्या सर्व मनस्वी प्रकल्प कर्मचाऱ्यांचे विद्यालयातील मुख्याध्यापक धनराज घुगे यांनी मनःपूर्वक आभार मानले. या कार्यक्रमासाठी पालकांनी देखील उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

### कैलास गुरुलिंग स्वामी



दिंद्रुड : येथील कैलास गुरूलिंग स्वामी (वय ५३ वर्षे) यांचे छत्रपती संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात दिर्घ आजाराने शनिवार ०६ जुलै रोजी सायंकाळी निधन झाले. त्यांचा अंत्यविधी आज शनिवारी रात्रौ ९ वाजता त्यांच्या शेतात करण्यात आला.पश्चात आई, पत्नी,तिन भाऊ,एक बहीण,एक मुलगी असा परिवार आहे.गेवराई अंगणवाडी पर्यवेक्षिका महादेवी स्वामी यांचे पती तर दिंद्रुड येथील पत्रकार संतोष स्वामी यांचे ते काका होत.

### नवीन मतदार नाव नोंदणी करून घ्या-गोरख काळे

बीड: केंद्रीय निवडणूक आयोगाने दिनांक २५ जून ते २५ जुलै २०२४ नवीन मतदार नोंदणी कार्यक्रम जाहीर केला असून या दरम्यान मतदारांसाठी नवीन नाव नोंदणी, नाव व पत्ता दुरुस्ती, फोटो बदलणे, मतदार संघाचे नाव बदलणे, मयत व्यक्तीचे नाव कमी करणे, मोबाईल नंबर अपडेट करणे, आधार कार्डशी लिंक करणे, नवीन बनवणे या सर्व प्रकारच्या नोंदणी करण्याची मोहीम पुन्हा सुरु करण्यात आली आहे. याचा लाभ घ्यावा असे आवाहन मांग गारुडी समाजाचे जिल्हाध्यक्ष गोरख काळे यांनी केली आहे. आपल्या जिल्ह्यातील १८ वर्ष पूर्ण झालेल्या तरुण-तरुणी यांची नवीन मतदार नोंदणी तातडीने करुन घ्यावी. निवडणूक आयोगाच्या या संकेतस्थळावरुन ऑनलाइन पद्धतीने देखील नोंदणी करता येईल. नवीन मतदार नोंदणी करिता आपल्या जिल्ह्यात व बीड शहरातील १८ वर्ष पुर्ण झालेल्यानी नाव नोंदनी करावी असे मंग गारुडी समाजाचे जिल्हाध्यक्ष गोरख काळे यांनी केले आहे. तरी जास्तीत जास्त मतदार नोंदणी करुन घ्यावी

## रेल्वे मार्गावरील सर्व पुलांची दुरुस्ती करा-जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी



जिल्ह्यातील अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गावरील असलेल्या सर्व पुलांची दुरुस्ती करणे बाबत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी उपमुख्य अभियंता मध्य रेल्वे,अहमदनगर यांना निवेदन देऊन पुलाची दुरुस्ती तात्काळ करण्यात यावी अशी मागणी केली.

अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गावरील काठोडा, जरुड, बाभुळखुंटा, मौजवाडी, ढेकणमोहा तांडा, बक्करवाडी, हिवरसिंगा, मलकाचीवाडी,शिरापुर धुमाळ, घुगेवाडी या ठिकाणी पुल निर्माण करण्यात आलेले आहेत. या पुलांची उंची वाढविण्यासाठी पुला खालील भाग हा खोल करण्यात आलेला आहे. पुलांच्या दोन्ही बाजुला पावसाळ्यात पाणी पुलाखाली जमा होते व पुलात साचलेले पाणी सखल भाग असल्यामुळे बाहेर निघत नाही. यासाठी पाणी बाहेर काढण्यासाठी नाल्याचे काम करण्यात आलेले नसल्यामुळे पाणी पुलाखाली ३ ते ४ फुटा पर्यंत साचते व त्यामुळे वरील गावांच्या नागरिकांना दळणवळणासाठी मोठ्या प्रमाणात अडचण निर्माण होते. या करीता वरील प्रस्तावित गावांच्या शेजारी असलेल्या पुलातील पाणी काढण्यासाठी नाल्यांचे कामे तातडीने करण्यात यावेत व पाणी पुलांच्या बाहेर काढण्यासाठी कायमस्वरुपी योजना करण्यात यावी अशी मागणी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी मध्य रेल्वेच्या उप अभियंता अहमदनगर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## पालकांनी विद्यार्थ्यामधील अंगीभूत कलगुणानुसार पारख करावी -थोटे

बीड । प्रतिनिधी



माऊली विद्यापीठ केज संचलित आदर्श बालवाडी व माऊली प्राथमिक विद्यालय बीड चा शिक्षक पालक मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माऊली विद्यापीठ केजचे संचालक नवनाथ थोटे बापू,तसेच प्रमुख अथिती म्हणून महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या संध्या आयस्कर ,पालक प्रतिनिधी रावसाहेब घोडके,प्रमोद सरपते, बद्रीनाथ जटाळ,बालासाहेब घोडके तसेच मुख्याध्यापक संतोष माने यांची उपस्थिती होती.

कार्यक्रम प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्या सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.यानंतर कार्यक्रमाचे प्रस्ताविक सहशिक्षिका वंदना आवाड यांनी केले.यानंतर अनेक पालकांनी शाळेतील राबवत असलेल्या विविध उपक्रमाचे कौतुक केले त्याच बरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास घडवण्याकरिता सूचना मांडल्या.प्रमुख अतिथी संध्या आयस्कर यांनी पालकांना बालसंगोपन या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.पालक प्रतिनिधी सरपते सर यांनी सर्वांच्या वतीने सूचना मांडून पाल्याच्या भविष्यासाठी सहकार्य करू अशी भावना व्यक्त केली.अध्यक्षीय मनोगतातुन नवनाथ थोटे बापू यांनी विद्यार्थ्यां विद्यार्थ्यांतील तुलना टाळून त्यांच्या कलागुणानुसार पारख व्हावी अशी भावना व्यक्त करून अनमोल मार्गदर्शन केले.शाळेचे मुख्याध्यापक संतोष माने यांनी पालकांबरोबर चर्चा घडवून आणली त्याचं बरोबर विद्यार्थ्याच्या अडीअडचणी लक्षात घेतल्या व त्या सोडवण्याकरिता पालक व शिक्षक यांच्या एकत्रित प्रयत्नाची गरज असल्याचे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रमाकांत डोळस यांनी केले.

## वाढदिवसाचा खर्च सुधाकरच्या जगण्याला



### पत्रकारांच्या आवाहनात कांबळे ठरले 'दत्त'

माजलगाव । प्रतिनिधी

पत्रकार सुधाकर सोनवणे यांना गळ्याचा कर्करोग झाल्या नंतर सर्व स्तरातून त्यांचे दुख वाटून घेतले जात असताना काँग्रेस अनुसूचित सेल चे जिल्हाध्यक्ष तथा परळी मतदार संघाचे निरीक्षक दत्ता कांबळे यांनी आपल्या वाढदिवसाचा खर्च ५५५५ रु सुधाकर यांच्या आरोग्यासाठी दिला. माजलगाव पत्रकार संघाच्या आवाहनानंतर त्यांनी घेतलेल्या या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होते आहे.

माजलगाव पत्रकार संघाचे बाळासाहेब आडागळे परमेश्वर सोळंके, अमर साळवे, प्रचंड सोळंके, अनंत घडसिंगे यांनी सुधाकर सोनवणे साठी आवाहन केले आणि अनेकांनी यास प्रतिसाद दिला. सुधाकर सोनवणे यांच्या बद्दल ची माहिती लोकाशा मधून समोर येताच सर्व क्षेत्रातून मदतीचा ओघ सुरु झाला. माजलगाव मधील पत्रकारांनी या मदत कार्यात घेतलेली भूमिका कर्त्या सुधारकाची साक्ष असल्याचे बोलले जाते आहे. दत्ताभाऊ कांबळे यांचे सामाजिक कार्य नेहमीच आदर्श राहिलेले आहे. त्यांची मदत सुधाकर साठी संजीवनी ठरणार असल्याचे बोलले जात असून कांबळे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे .

## भागवत गोंडे यांनी पाळला गावकऱ्यांना दिलेला शब्द

वडवणी । प्रतिनिधी



चिंचोटीचे सरपंच भागवत गोंडे यांनी चिंचोटी गावकऱ्यांना दिलेला शब्द पाळण्यासाठी विविध विकास कामांचा धडाका लावला आहे. गावातील जिल्हा परिषद शाळा, दलित वस्ती, गावांतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसवणे, अंडरग्राउंड नाली तयार करणे, सिमेंट रस्ते बांधणे यासारख्या विविध विकास कामांचा शुभारंभ शुक्रवारी करण्यात आला. योगायोग असा की याच दिवशी भागवत गोंडे यांचा वाढदिवस असल्यामुळे गावामध्ये विविध ठिकाणी वृक्षारोपण ही करण्यात आले. या विविध विकास कामांच्या भूमिपूजन कार्यक्रमासाठी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

..चिंचोटी येथे मागील सहा महिन्यांपासून सरपंच पदावर विराजमान झालेले भागवत गोंडे यांनी सरपंच पदाचा कारभार घेतल्यापासून गावातील विविध प्रश्न सोडवण्यासाठी धडपड सुरू केलेली आहे. त्यांनी गावातील शेतकऱ्यांसाठी रोजगार हमी योजनेतून विहिरी, गाय गोठे तसेच फळबाग लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केलेले आहे. त्याचबरोबर गावातील विविध रस्ते, नाल्या त्याचबरोबर जिल्हा परिषद शाळेमधील पेव्हर ब्लॉक बसवणे, संरक्षण भिंत बांधणे त्याचबरोबर शाळेची दुरुस्ती यासारख्या कामांना त्यांनी हाती घेतले आहे. या विविध कामांचा भूमिपूजनाचा कार्यक्रम शुक्रवारी सकाळी दहा वाजता आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक, गावचे सरपंच भागवत गोंड यांच्या सह उपसरपंच गोविंद गोंडे, ग्रामपंचायत सदस्य गोरख तात्या गोंडे, केशव काकडे, बाळू सोनवणे, साहेबराव गोंडे, केशव गोंडे, गणेश बापू गोंडे, दादासाहेब गोंडे, लक्ष्मण सोनवणे, माऊली गोंडे, अशोक फपाळ सर, नंदू गोंडे, ग्रामसेवक काशीद आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले. गावातील सर्व नागरिकांसाठी ग्रामपंचायतच्या वतीने विविध सेवा उपलब्ध करून दिल्या जातील अशी ग्वाही यावेळी सरपंच भागवत गोंडे यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक गोंडे यांनी केले.

## स्व.विनायकराव मेटे यांचा सामाजिक कार्याचा वारसा अविरतपणे चालवणार - आशुतोष मेटे

कडा । प्रतिनिधी

कडा येथे लोकनेते स्व. विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सर्वरोगनिदान शिबीर व रक्तदान शिबिराचे उदघाटन ह.भ.प.दादा महाराज चांगुणे, आशुतोष मेटे, जयदत्त धस यांच्या शुभहस्ते करण्यात आले. शिवसंग्राम आष्टी यांनी आयोजित केलेल्या या भव्य रोगनिदान शिबिर व रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना आशुतोष मेटे म्हणाले की, समाजकारणाचा वसा घेऊन राजकारणात नावलौकिक मिळवून स्व.मेटे साहेबांनी अविरतपणे कार्य केले. त्यांच्या कार्यावर नागरिकांचा अफाट विश्वास होता महाराष्ट्रात त्यांनी राजकीय व सामाजिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सर्वसामान्य कुटुंबातील असूनदेखील सामान्यातील असामान्य कामगिरी करून आपले वेगळेपण सिद्ध करून आपल्या सारख्या तरुण पिढीपुढे एक आदर्श उभा केला. मागील काही वर्षांपूर्वी मार्च-एप्रिल २०२० मध्ये राज्यात कोरोनाने थैमान घातले होते.या काळात स्व.मेटे साहेबांनी सर्वसामान्य लोकांना आधार देत अतिशय उत्कृष्ट



काम करून विनामूल्य कोविड सेंटरची उभारणी करून कोविडग्रस्ताना आधार देण्याचे मोठे कार्य केले होते त्याचबरोबर संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी कार्यकर्त्यांना सूचना देत कोविड ग्रस्तासाठी शिवसंग्रामची हेल्पलाईनच्या माध्यमातून मदत केली.

लोकनेते स्व.विनायकराव मेटे यांनी मराठा आरक्षण,अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासाठी वेळोवेळी रस्त्यावर व विधीमंडळात कायम मागणी लाऊन धरली वेळप्रसंगी विधिमंडळ बंद पाडले यासह मुस्लिम, धनगर आरक्षणाच्या बाबतीतही त्यांनी पुढाकार घेतला. अश्या विविध प्रकारच्या सामाजिक कार्यामुळे स्व मेटे साहेब यांनी जन माणसाच्या ह्रदयात जागा निर्माण केली परंतू ''जो आवडे सर्वाना तोच आवडे देवाला'' म्हणीप्रमाणे ते आपल्याला सोडून गेले, यावर अजून पण विश्वास बसत नाही. लोकनेते स्व.विनायकराव मेटे यांनी घालून दिलेला वसा आणि वारसा अविरतपणे पुढे चालविण्याचे काम आदरणीय डॉ. ज्योती मेटे व आम्ही करू असा विश्वास शिवसंग्रामचे युवक प्रदेश उपाध्यक्ष आशुतोष मेटे यांनी दिला. यावेळी डॉ.संदिप गाडे, डॉ.प्रशांत तांदळे, डॉ विजय गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वरोग निदान शिबीर व रक्तदान शिबिर, नेत्र रोग तपासणी असे विविध सामाजिक उपक्रमही राबविण्यात आले. जागर सामाजिक अभियान कार्यक्रमास युवराज पाटील, दिपक कर्डीले, रमजान तांबोळी,अनिल ढोबळे, अंकुश खोटे, राजाबापू कर्डीले, बाळासाहेब कर्डीले, संभा कर्डीले, योगेश भंडारी, बिपिन शेठ भंडारी,अशोक दादा चौधरी, मुन्ना शेठ पोखर्णा, शाम सांगळे, शंकर देशमुख, सुनिल नाथ, मुश्ताक पानसरे, सरपंच सागर आमले, विजय गाढवे, ठकाराम दुधावडे, अनिल शिंदे, प्रवीण बहिर, डॉ.संदिप टेकाडे, डॉ.पंडित खिलारे, डॉ.शिवाजी शेंडगे, डॉ माधव चौधरी, गणेश मोरे, शैलेश सुरवसे सरपंच तात्या नालकोल, प्रा.ज्ञानदेव थोरवे, माऊली गायकवाड, शिवाजी म्हस्के, बाबू धनवडे, अशोक चौधरी, सुरेश सोनवणे, सागर ढोबळे, सुधिर ढोबळे, जयंत देशमुख, लखन राऊत, मयूर चव्हाण, संतोष जाधव, संकेत चौधरी, पवन चौधरी आदी उपस्थित होते.

# विठ्ठल नामाच्या जयघोषात साजरा झाला अश्व रिंगण सोहळा

## वारकऱ्यांनी चालवली मनोऱ्यातून भिंत, फुगड्या व कुस्त्यांचा रंगला खेळ

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील योगेश्वरी महाविद्यालयाच्या मैदानावर शनीवारी सायंकाळी विठ्ठल नामाच्या जयघोषात अश्व रिंगण सोहळा रंगला होता. संतश्रेष्ठ नरसी नामदेव व गंगाखेड येथील संत जनाबाई या पालख्यांच्या एकत्रीकरणातून येथे हे अश्व रिंगण झाले. यात वारकऱ्यांच्या फुगड्या व बाल वारकऱ्यांनी मनोरे सादर केले.

सायंकाळी ५ वाजता या पालख्यांचे योगेश्वरी महाविद्यालयाच्या मैदानावर आगमन झाले. भगव्या पताका हाती घेतलेल्या वारकऱ्यांनी गोल रिंगण केले. बघता, बघता या रांगणात अश्व फिरवण्यात सुरूवात झाली. हरीनाम व विठ्ठल नामाच्या जयघोषात अश्वानेही रिंगणात फिरण्याचा वेग घेतला. डोळ्याचे पारणे फेडणारा हा अश्वरिंगण सोहळा बघण्यास शहर व परिसरातील नागरिकांनी गर्दी केली होती. महिलांची संख्याही मोठी होती. संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी उपस्थित महाराज व वारकऱ्यांचे स्वागत केले. या अश्वरिंगणानंतर याच रिंगणात वारकऱ्यांनी फुगड्या व कुस्त्यांवरही ठेका धरला होता. टाळ, अभंगाच्या तालात वारकरी या खेळात दंग झाले होते. बाल वारकऱ्यांनी मनोरे सादर करून उपस्थितांना चकित केले. या सोहळ्यात देखणा व सजविलेला अश्व, भगवी पताका हाती घेतलेले वारकरी लक्ष ठेवून घेत होते. संत ज्ञानेश्वरांनी भिंत चालविलेल्या देखाव्याची भाविकांनी प्रशंसा केली. वृध्द व तरुण वारकऱ्यांच्या कुस्त्या, महिलांच्या फुगड्या व मैदानी खेळात भाविक खेळात तल्लीन झाले होते. यावेळी आ.नमिता मुंदडा,अक्षय मुंदडा, रिंगण सोहळ्याचे स्वागताध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, दिलीप सांगळे, सुलोचना सांगळे,मुकुंदराज संस्थांचे किसन महाराज पवार, बाबा महाराज जवळगावकर, दिलीप गित्ते, संयोजन समितीचे प्रकाश बोरगावकर, बळीराम चोपणे, अनिकेत डीघोळकर,अनंत आरसुडे, ॲड. संतोष लोमटे, अभिजित गाठाळ, नागेश औताडे, प्रशांत आदनाक, योगेश कडबाने, शैलेश स्वामी, बालासाहेब शेरेकर, व मान्यवरांची उपस्थिती होती. अश्व रिंगण सोहळ्याच्या निमित्ताने वारकऱ्यांसाठी पिण्याचे पाणी व फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. हा रिंगण सोहळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाच्या वतीनेही चोख नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे भविकांना आनंदाने यात सहभागी होता आले. हा रिंगण सोहळा पाहण्यासाठी अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील महिला व भाविकांनी मोठी गर्दी केली होती.





### दिंड्या एकत्रीकरणसाठी प्रयत्नशील– नंदकिशोर मुंदडा

विदर्भ, मराठवाडा व परिसरातून अंबाजोगाईमार्गे जवळपास २७४ दिंड्या पंढरपूरकरडे जातात. छोट्या –मोठ्या दिंड्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या वारकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी आगामी काळात या छोट्या दिंड्यांना एकत्रित करून या सर्व दिंड्या नरसी नामदेव महाराज व संत जनाबाई यांच्या दिंड्यासोंबत एकत्रित कशा जातील? यासाठी आपण अश्वरिंगण सोहळ्याचा स्वागताध्यक्ष म्हणून प्रयत्न करणार असल्याचे नंदकिशोर मुंदडा म्हणाले.

### वारकऱ्यांची आरोग्य तपासणी

अश्वरिंगण सोहळ्या निमित्त पायी वारीसाठी आलेल्या वारकऱ्यांसाठी शिवसंग्रामच्या वतीने धनेश गोरे व अभिजित लोमटे यांच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ बाळासाहेब लोमटे,डॉ.अमित सुर्वसे,डॉ.विजय बागडे, शैलेश देशपांडे,गणेश शिंदे व पथकाने ३०० वारकऱ्यांची तपासणी व औषधे दिली.

### वारकरी वेशभूषा स्पर्धेचे आयोजन

आज झालेल्या पालखी रिंगण सोहळ्याच्या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांसाठी लहान गट व मोठ्या गटात बाल वारकरी वेशभूषा स्पर्धेचे आयोजन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले होते. या स्पर्धेत अंबोजगाईच्या विविध बालकलावंतांनी आपला सहभाग नोंदवून आपला कलाविष्कार सादर केला. विविध दिंड्या व गितांच्या माध्यमातून व्यसनमुक्ती, पर्यावरणाचे संवर्धन, प्लॉस्टिक मुक्ती, असे विविध संदेश या विद्यार्थ्यांनी दिले. यावेळी आ. नमिता मुंदडा व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्या संघांना बक्षीस वितरण करण्यात आले.

### या पालखी प्रमुखांचा झाला सन्मान

अंबाजोगाईत रिंगण सोहळ्याच्या निमित्ताने विदर्भासह मराठवाड्यातील येणाऱ्या पालखी प्रमुखांचा व दिंडीतील विनेकरी यांचा सन्मान यावेळी स्वागत समितीच्या वतीने करण्यात आला.

# उद्योगांच्या वीजबिलातील डिमांड चार्जेस कमी करा

## बीडमधील उद्योजकांची सहव्यवस्थापकीय संचालक गुप्ता यांच्याकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

राज्यभरातील उद्योजकांना दरमहा विजबिलामध्ये स्थीर आकार शुल्क लागतात. उद्योग सुरु असो अथवाबंद तरीही बिलामध्ये हे चार्जेस लावलले असतात. सध्या उद्योजक अडचणीत असतांना सदर चार्जेस कमी करावेत या प्रश्नावर बीडमधील व्यापारी महासंघाच्या पदाधिकार्यांनी महावितरणचे सह व्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता यांची बीडमध्ये भेट घेवून चर्चा केली.

बीडसह राज्यभरातील उद्योजकांना विविध जाचक अटी, नियमांमुळे अडचणी येत आहेत. यातच महावितरणकडून आकारण्यात येणारे शुल्कही अवाजवी ठरत असून याबाबत चर्चा करण्यासाठी बीडमधील व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष तथा उद्योजक अशोक शेटे, ऑईल मील असोसिएशन अध्यक्ष राजूसेट संचेती, निखील गोपाल कासट, मुख्य अभियंता महावितरण कांबळे साहेब, कार्यकारी अभियंता पाटील, वाघमारे , अजीत लददड वीजय सारडा, अति. कार्यकारी अभियंता बीड शहर अनिस मिर्झा, सहायक अभियंता महावितरण गणेश पारीख, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उद्योगांसाठी आकारण्यात येणारे डिमांड चार्जेस कमी करावेत. हे शुल्क उद्योजकांसाठी नुकसानकारक आहेत. उद्योजक हे राज्य सरकारला विविध प्रकारचे कर देतात. वीजबील भरण्यात आम्ही कोणताही कसूर करत नाहीत परंतु दरमहा लागणारे डिमांड चार्जेस रद्द करावेत, गुजरातच्या तुलनेत आपल्याकडे वीजदर जास्त आहेत ते कमी करावेत, एमआयडीसीला गावठाण फि डर जोडले आहे. त्यामुळे बरेच वेळेस लाईट जाते. गावठाण फि डर वेगळे करावे, तसेच आता अनेक उद्योजक सोलारवर भर देत आहेत, त्याची प्रक्रिया विलंब न लागता जलद करण्यात यावी या मागण्या करण्यात आल्या. यावेळी राहुल गुप्ता यांनी या सर्व विषयांवर व्यापारी महासंघाच्या पदाधिकार्यांशी चर्चा करुन यातून मार्ग काढण्याबाबत पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.



## पत्रकार नंदु गायकवाड यांना मातृशोक

**बीड । प्रतिनिधी**

येथील ज्येष्ठ नागरिक श्रीमती अंजनाबाई सोपानराव गायकवाड यांचे शनिवार दि.६ जुलै रोजी दिर्घ आजाराने निधन झाले. बीड येथील पत्रकार नंदु गायकवाड यांच्या त्या मातोश्री होत्या.



अंजनाबाई गायकवाड यांच्यावर गत सात दिवसापासून बीडच्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु होते. मात्र शनिवार दि.६ जुलै रोजी दुपारी ३.३० वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. मृत्यूसमयी त्यांचे वय ६५ वर्ष होते. त्यांच्या पश्चात एक मुलगी दोन मुले, सुना ,नातवंडे असा मोठा परिवार आहे .बीड येथील पत्रकार नंदु गायकवाड यांच्या त्या मातोश्री होत्या.गायकवाड परिवाराच्या दु:खात दै.राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

## मनसेच्या वतीने गुणवंतांचा सत्कार संपन्न

**परळी । प्रतिनिधी**

बालाघाट मनसे संपर्क कार्यालय येथे इयत्ता आठवीच्या , आणि स्कॉलरशिप परीक्षेत विशेष प्राविण्याने उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी चिरंजीव गौरव हरंगुळे व चिरंजीव सर्वेश हरंगुळे या विद्यार्थ्यासह त्यांच्या पालकाचे कौतुक करण्यात आले यावेळी मार्गदर्शन करताना ॲड,प्रवीण सरवदे यांनी या विद्यार्थ्यांना भविष्यातील व या परीक्षा देण्यासाठी प्रेरित केले तर मनसे तालुकाध्यक्ष श्रीकांत पाथरकर यांनी धैर्य ,आत्मविश्वास, सातत्य हे महत्त्व सांगितले व भावी कारकीर्द साठी शुभेच्छा दिल्या तसेच मनसेचे परळी शहराध्यक्ष वैजनाथ कळसकर यांनी दोन्ही विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन समाज उपयोगी भूमिका घ्यावी असे आव्हान करून शुभेच्छा दिल्या यावेळी मनसे तालुका उपाध्यक्ष विठ्ठल दादा झिलमेवाड, प्रशांत कामाळे, ऋषिकेश बारगजे, गोविंद लोखंडे , नरहरी लोखंडे उपस्थित होते.



## खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वाढदिवसा निमित्त आयान शौकत पठाण यास सायकल भेट

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या बीड लोकसभा निवडणुकीत लोकसभेचे उमेदवार मा.श्री बजरंग बप्पा सोनवणे हे प्रचारादरम्यान तागडखेल ता.आष्टी येथे आले असता आयान शौकत पठाण या लहान मुलाने, एक एक रुपया जमा करून सायकल घेण्यासाठी ठेवलेली जमा रक्कम ( गल्ला ) हा श्री बजरंग बप्पा सोनवणे यांना लोकसभेच्या निवडणुकीसाठी खर्च करण्यासाठी दिला होता. आज खा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी आयान शौकत पठाण यांना सायकल भेट देऊन माणुसकीचे दर्शन घडवून आणले आहे. तळागाळातील लोकांशी नाळ जोडणारे निष्ठावंत खासदार म्हणून बजरंग बप्पा सोनवणे या सायकल भेटीतून दिसून येत आहेत.



पठाण कुटुंबाच्या व तागडखेल ग्रामस्थांच्या तोंडून आज नेता दिल्लीत ! पण लक्ष गल्लीत !! असे चित्र दिसून आले. यावेळी पठाण कुटुंबासह, युवा नेते आमोल आमले. स्वप्निल पोटे ,समाजसेवक परमेश्वर रामचंद्र घोडके ,संजय आमले, राजेश थोरात ,आकाश नरोले ,ऋषिकेश थोरात, बाळु आमले ,रामेश्वर गव्हाणे,समीर पठाण, रामनाथ गव्हाणे, उस्मान पठाण, बाळू गव्हाणे, शरद गव्हाणे, शांताराम गव्हाणे, अंबादास पिंपळे, संदीप चव्हाण, देविदास पिंपळे सह ग्रामस्थ उपस्थित होते.

# पी एम किसान योजनेच्या लाभार्थ्यांना अनुदान मंजूर करुन बंद केलेले अनुदान शेतकऱ्यास तात्काळ वाटप करा

## मागणीसाठी भाई गंगाभिषण थावरे यांनी ठोकले कृषी कार्यालयास कुलूप

**माजलगाव । प्रतिनिधी**

पी. एम. किसान योजनेच्या लाभार्थ्यांना अनुदान मंजूर करणे व ज्या लाभाव्यांचे पी. एम. किसान योजने चया अनुदानाचे हप्ते बंद केलेले आहेत, त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करून त्यांनाही लाभ तात्काळ देण्यात यावा या मागणीसाठी भाई गंगाभिसन थावरे शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष यांनी शेतकऱ्यासह कृषी कार्यालयाला कुलूप ठोकले. व अधिकाऱ्याच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे घेतले.

केंद्र शासनाकडून पी.एम. किसान योजनेचे रक्कम ही लाभार्थी शेतकऱ्यांना मिळत होती. परंतू काही लाभार्थ्यांना एक-दोन हप्ते गिळाल्यानंतर त्यांची पी.एम. किसान योजनेचे हप्ते बंद करण्यात आले होते. तरी बंद करण्यात आलेल्या शेतकरी लामार्थाच्या कागदपत्रांची पडताळणी करून त्यांनाही पी.एम. किसान योजनेचे हप्ते देणे आवश्यक आहे. उदा-माजलगांव मतदार संघामध्ये कमीत कमी २५ ते ३० हजार ०२/०७/०९ लाभार्थ्यांचे, पी.एम. किसान योजनेचे फॉर्म पडून आहेत, परंतू सदरील फॉर्म हे लाल फितीच्या विळ्याख्यातून बाहेर पडत नाहीत. यास जबाबदार प्रशासन ◀◀ पान ३ वर




# ज्ञानोबा तुकाराम जयघोष करीत भक्तीमय वातावरणात संत मदन महाराज यांच्या पायी दिंडी पालखी सोहळ्याचे प्रस्थान

**आष्टी । प्रतिनिधी**

श्री संत मदन महाराज श्री क्षेत्र कडा पायी दिंडी पालखी सोहळ्यात राजकीय सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते.

यावेळी संत मदन महाराज देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल यांच्यासह दोन हजार भाविक भक्त समवेत आहेत.हा पायी दिंडी सोहळा संतनगर कड्यातुन प्रस्थान झाला आहे.महाराष्ट्र ही संतांची आणि वीरांची भूमी आहे.संत परंपरांच्या अध्यात्मिक सलोखा आणि समतेच्या बंधुत्व पूर्व नात्यांनी गुंफण केलेल्या या पवित्र मातीत ईश्वर चरणी नतमस्तक होण्याची मोठी परंपरा आहे.आषाढीनिमित्त २० लाख वारकरी महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरुन पंढरीला येतात.पंढरपूरात येऊन चंद्रभागेच्या वाळवंटात नतमस्तक होऊन विठ्ठलाचा आशीर्वाद घेणारे वारकरी आहेत. बीड जिल्ह्यातील गहिनीनाथगड,कडा येथुन संत मदन महाराज यांच्या निघालेल्या पायी दिंडी पालखी सोहळ्यात ५० हजार वारकरी सहभागी झालेले आहेत. आषाढी वारीनिमित्त

“ ग्यानबा तुकारामाच्या “ थ जयघोषात कडा येथील श्री संत मदन महाराज संस्थानच्या दिंडीचे रविवारी पंढरपुरकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले.सुरुवातीला संत मदन महाराज मठासमोर रथाची विधिवत पूजा संस्थांचे अध्यक्ष ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर संपूर्ण गावभर ◀◀ पान ३ वर



# नारायण गडाची दिंडी निघाली, टाळ–मृदुंगाच्या गजरात पंढरीला

### नवगण राजुरीत आ.संदीप क्षीरसागरांनी केले स्वागत

**बीड । प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे श्री क्षेत्र नारायणगड येथून आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे दिंडी रवाना झाली आहे. दरम्यान रविवारी (दि.७) रोजी ही दिंडी नवगण राजुरी येथे आली असता आ.संदीप क्षीरसागर यांनी ग्रामस्थांसह दिंडीचे स्वागत केले.

दरवर्षी श्रीक्षेत्र नारायणगड येथून आषाढी एकादशीच्या वारीसाठी पंढरपुरला जात असते. याहीवर्षी श्री क्षेत्र नारायणगड येथून आषाढी एकादशीच्या वारीला शेकडो वारकरी पंढरपुरला निघाले आहेत. रविवारी (दि.७) रोजी नवगण राजुरी गावात आली होती. यावेळी ग्रामस्थांसह जाऊन आ.संदीप क्षीरसागर यांनी दिंडीचे स्वागत केले. महंत ह.भ.प.शिवाजी महाराज व वारकर्यांचे आ.क्षीरसागर यांनी आशिर्वाद घेतले.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतले श्री संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे दर्शन

## बारामती ते काटेवडी वारकऱ्यांसोबत पायी चालत वारीत सहभाग

**पुणे । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी सपत्नीक बारामती येथे पालखी सोहळ्याला भेट देऊन जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे दर्शन घेतले.त्यांनी बारामती ते काटेवडी वारकऱ्यांसोबत पायी चालत वारीत सहभाग घेतला.





जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' च्या जयघोषात, टाळ मृदंगाच्या गजरात, हाती दिंड्या-पताका, मुखी विठ्ठल नामअशा भक्तिमय वातावरणात आज सकाळी काटेवाडीकडे प्रस्थान झाले. यावेळी खासदार सुनेत्रा पवार, अपर पोलीस अधीक्षक संजय जाधव, उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, उपमुख्यमंत्र्यांचे खासगी सचिव हनुमंत पाटील, महावितरणचे मुख्य अभियंता सुनील पावडे, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उप विभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड, तहसीलदार गणेश शिंदे, गट विकास अधिकारी अनिल बागल आदी उपस्थित होते. श्री. पवार यांनी पुष्पहार अर्पण करून संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे दर्शन घेतले. त्यांनी वारीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांसोबत संवाद साधला आणि टाळाच्या साथीने विठूनामाचा गजर केला.

पालखी मार्गावरील असलेल्या गावातील चौकात रांगोळी काढून, फुलांची उधळण करत तुकोबारायांच्या पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचा आज इंदापूर तालुक्यातील सणसर येथे मुक्काम असणार आहे.

# कौटुंबिक न्यायालयाचा महत्वाचा निर्णय! पत्नीला नाकारत केवळ मुलीला दिली पोटगी

पुणे । प्रतिनिधी

लग्न झाल्यानंतर काही दिवसांतच छोट्या-मोठ्या बाबींवरून सातत्याने वाद होत असल्याने पत्नीपासून घटस्फोट मिळण्यासाठी न्यायालयात गेलेल्या पतीला न्यायालयाने काहीसा दिलासा दिला आहे. पती-पत्नीची आर्थिक पत आणि पत्नीच्या विवाहबाह्य संबंधाबाबत दाखल पुरावे विचारात घेत न्यायालयाने पत्नीचा सांभाळ करणे ही पतीची नैतिक जबाबदारी नाही, असे नमूद करत पत्नीला पोटगी नाकारली आहे. तसेच या प्रकरणात केवळ मुलीला पोटगी मंजूर केली आहे.



कौटुंबिक न्यायालयातील न्यायाधीश रघुवेंद्र आराध्ये यांनी हा निकाल दिला. दावा दाखल केल्यापासून याचिकेचा निकाल लागेपर्यंत मुलीला दरमहा पाच हजार रुपये पोटगी द्यावी, असे आदेशात नमूद आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, सुरेश आणि सुरेखा (नावे बदललेली) यांचा २९ डिसेंबर १९९६ ला विवाह झाला आहे. त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी असे दोन अपत्य आहेत. लग्नानंतर काही दिवसांतच त्यांच्यात छोट्या मोठी भांडणे सुरू झाली. सततच्या भांडणांना कंटाळून सुरेश यांनी ॲड. गौरी देशपांडे यांच्यामार्फत कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज केला होता. त्यानंतर पतीकडून ५० हजार रुपये पोटगी मिळावी यासाठीचा दावा सुरेखा यांनी दाखल केला होता.

या दाव्यात पती-पत्नीने त्यांच्या उत्पन्नाबाबतची माहिती व कागदपत्रे सादर केली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि न्यायालयात सादर असलेली कागदपत्रे विचारात घेऊन न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, ''दाव्यात दाखल करण्यात आलेले प्रातिकराचे विवरणपत्र हे दोघेही आर्थिक दृष्ट्या कितपत सक्षम आहेत हे दाखविण्यासाठी पुरेसे ठरतात. सुरेखा यांचे त्रयस्थ व्यक्तीसोबत झालेले संभाषण आणि पाठवलेले फोटो पाहता तूर्तास कुठलाही निष्कर्ष नोंदविणे योग्य ठरणार नाही. मात्र माझ्या मते ते निश्चितपणे आक्षेपार्ह आहे. या सर्व बाबी विचारात घेता पत्नीचा सांभाळ करणे ही पतीची नैतिक जबाबदारी राहात नाही.'

# लाडक्या बहिणींना देता, दाजींचं काय?, अमोल कोल्हेंचा सवाल

## मनसेनंही भावांसाठी झळकावले बॅनर

शिरूर । प्रतिनिधी

राज्य सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली असून राज्यातील अडीच लाखांपेक्षा जास्त महिला भगिनींना दरमहा १५०० रुपये देण्यात येणार आहेत. त्यामुळे, महिला भगिनींची अर्ज भरण्यासाठी धावाधाव सुरू आहे. तर, दुसरीकडे ऐन निवडणुकांच्या तोंडावर सरकारने ही योजना लागू केल्यामुळे राजकीय वादही रंगला आहे. लाडक्या बहिणीसाठी योजना आणली, लाडक्या भावांचं काय, असा सवाल उपस्थित केला जात आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही असा सवाल विचारला होता. आता, खासदार अमोल कोल्हे यांनीही लाडक्या दाजींचं काय, असा सवाल आता बहीणच विचारत असल्याचे म्हटले आहे. तर, मनसेच्या वाहतूक सेनेनंही वाहनचालक भावाला मदतीचा हात देण्याची मागणी केली आहे.



राज्य सरकारने 'लाडकी बहीण' योजना आणुन महिला भगिनींना महिन्याला दीड हजार रुपये देण्याची घोषणा केली ही चांगली बाब आहे. परंतु, त्याच बहिणीचे म्हणणे असेल लाडकी बहीण म्हणून जेवढे देता तेवढं आमच्या दाजींना शेतीमालाला भाव द्या, दुधाला भाव द्या. तसेच ताई आणि दाजींच्या मुलांच्या शिक्षणासाठी सवलत द्यावी, असा खोचक टोला डॉ अमोल कोल्हे यांनी राज्य सरकारला लागवला आहे. शिरुर शहरातील पंचायत वाडा याठिकाणी खा. अमोल कोल्हे यांचा जाहीर नागरी सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. दरम्यान, राज्यात माझी लाडकी बहीण योजना चर्चेचा आणि राजकीय वादाचा विषय ठरली आहे. तर, सोशल मीडियावरही या योजनेवरुन मिम्स व्हायरल होत आहेत. लाडक्या बहिणीचं भलं झालं, पण लाडक्या भावांचं काय, असा सवालही मिश्कीलपणे विचारला जात आहे.

# रोटरी निगडीच्या अध्यक्षपदी सुहास ढमाले तर सचिवपदी रवींद्र कदम

पिंपरी(प्रतिनिधी) रोटरी क्लब निगडीच्या अध्यक्षपदी रो. सुहास ढमाले तर सचिवपदी रो. डॉ रवींद्र कदम यांची निवड करण्यात आली. क्लबच्या सर्व संचालक मंडळाचा पदग्रहण सोहळा रावेत येथे संपन्न झाला.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ चे प्रांतपाल शीतल शहा , सहाय्यक प्रांतपाल प्रा. शिल्पागौरी गणपुले उपस्थित होते.अध्यक्ष सुहास ढमाले यांनी समाजाप्रती प्रामाणिकपणे आणि जबाबदारीच्या भावनेने सामाजिक कार्य करण्याचे आणि रोटरीची जादू सर्वत्र पोचविण्यास आम्ही वचनबद्ध असल्याचे सांगितले. सर्व संचालकांनी देखील सामाजिक कार्य करण्याची शपथ घेतली. कार्यकारिणी मंडळ - सुहास ढमाले (अध्यक्ष), हरबिंदर सिंग (माजी अध्यक्ष),केशव मानगे (नियोजित अध्यक्ष), शशांक फडके (उपाध्यक्ष), डॉ रवींद्र कदम (सचिव), गुरदीपसिंग (प्रशासकीय), आश्विन कुलकर्णी (सेवा), मुकुंद मुळे (वैद्यकीय), विनोद बंसल(खजिनदार), सुनील जोशी (प्रसिद्धी प्रमुख), राकेश श्रीवास्तव (माहिती तंत्रज्ञान ), विजय काळभोर(फौंडेशन ), जयंत येवले (सीएसआर), अंकाजी पाटील (मेंबरशिप), रवी राजापूरकर (ग्लोबल ग्रॅण्ट), रमेश राव (विशेष प्रकल्प), गणेश भालेराव (युवा),अनिल कुलकर्णी (देखरेख), जगमोहन सिंग ( प्रशिक्षण), राणू सिंघानिया ( प्रशांतता),सुभाष जयसिंघानी (नियंत्रण), शुभांगी कोठारी ( प्रांत संयोजक )

# अर्धवट वारी करणारे हौशे-नवशे-गवशे, शरद पवारांचा अजित पवारांना टोला; सुप्रिया सुळे म्हणाल्या, मीही हौशे-नवशेतील एक

बारामती । प्रतिनिधी

पुणे : वारी ही आळंदी ते पंढरी अशी करतात असं सांगत अधेमध्ये जे वारी करतात ते हौशे-नवशे-गवशे असतात असा टोला शरद पवारांनी अजित पवारांचे नाव न घेता लगावला होता. त्यासाठी पवारांनी वारी करणाऱ्या रशियातील एका महिलेचा संदर्भ दिला होता. त्यावर तिथेच उपस्थित असलेल्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आपणही त्या हौशे-नवशेतील असल्याचं सांगितलं.

एक जुनी आठवण सांगताना शरद पवार म्हणाले की,मी रशियात गेलो असताना तिथली महिला माझ्यासोबत मराठीत बोलत होती. त्यावेळी मला सांगितले की त्या वारी करतात. त्या वारीला पुण्यात आल्या तेव्हा मी घरी बोलावले. त्यावेळी पुण्यातील एका महिलेने त्यांना



विचारले तुम्ही वारी कुठून करता? तर ती रशियन महिला म्हणाली वारी ही आळंदी ते पंढरपूर करायची असते. अधेमध्ये जे वारी करतात त्यांना हौशे नवशे गवसे म्हणतात. अजित पवारांनी बारामती ते काठेवाढी असा वारीमध्ये सहभाग नोंदवला. त्यावर अजित पवारांनी त्यांना टोला लगावला. त्यानंतर सुप्रिया सुळे यांनी मीदेखील हौशे-नवशे-गवशे या प्रकारातील असल्याची कबुली दिली.

**पालखीचा विषय आमच्या आस्थेचा....**

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, मी पूर्ण वारी करत नाही. मी हौशे नवशे त्यातील एक आहे. गेल्या १८ वर्षांपासून मी पालखीत चालते. यंदा दिवे घाटाची पालखी चुकली. पालखी हा राजकीय विषय नाही तर तो आमच्या आस्थेचा विषय आहे. पांडूरंग एकच असा देव आहे की जो म्हणतो माझ्याकडे येऊ नका, मी स्वतः दर्शन द्यायला येतो.

# कार आणि एसटी बसची समोरासमोर भीषण धडक; २ जण जागीच ठार

**ओतूर । प्रतिनिधी**

पारनेर ते मुंबई ही एसटी बस ओतूरच्या दिशेने येत असताना ओतुरहून आळेफाट्याच्या दिशेने जाणारी ब्रीझा कार (एम. एच. ४६ सी. एम. २१५५ ) या दोन वाहनांची समोरासमोर भीषण धडक झाली. यामध्ये ब्रिझा कारचा चालक व आणखी एकजण असे दोनजण जागीच ठार झाले. एस. टी. बस (एम. एच. १४ बी. टी. ४२८०) मधील १५ प्रवासीही जखमी झाले. एकजण गंभीर जखमी झाल्याने त्याला उपचारासाठी पुणे येथे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.ए. टी. बसमध्ये एकूण चाळीस प्रवासी प्रवास करीत असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

हा भीषण अपघात आज (रविवार) सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास ओतूर येथील अण्णासाहेब वाघीरे महाविद्यालयाच्या नजीक घडला. दरम्यान या अपघातातील मृतांची नावे अद्यापही मिळू शकली नाहीत. अपघाताची खबर मिळताच ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे, पोलीस उपनिरीक्षक अजित पाटील पोलीस हवा. शामसुंदर जायभाय, मनोज कोकणी, विलास कोंधवळे व इतर पोलीस फौज फाटा घटनास्थळी हजर होऊन मदत कार्य सुरू केले. दरम्यान ब्रिझा कारचा पूर्ण चक्काचूर झाला असून जखमींना उपचार करून घरी सोडण्यात आले आहे.

# निमगाव केतकी येथे पालखी स्वागताची तयारी

**निमगाव केतकी । प्रतिनिधी**

संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा मंगळवारी (ता. ९) निमगाव केतकी येथे मुक्कामी येत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थ, विविध पतसंस्था, मंडळे यांनी पालखी सोहळा स्वागताची तयारी केली आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना अन्नदानाची व्यवस्था केली आहे. ग्रामपंचायतीने पालखीतळ, गावठाणात स्वच्छता मोहीम राबविली आहे. पालखी तळावरती मंडप उभारण्यात आला आहे. सराफवाडी चौक, पालखी मैदान या पट्ट्यात स्वच्छता करण्यात आली आहे. निर्मलवारी उपक्रमांतर्गत वेगवेगळ्या भागात शौचालयाची व्यवस्था केलेली आहे.

वीज वितरण कंपनीने पालखी काळात २४ तास वीज उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे. तसेच ग्रामीण रुग्णालयाने पालखी काळामध्ये २४ तास आरोग्य सेवा देण्याचे नियोजन केले आहे. रुग्णालयामध्ये मुबलक औषधसाठा उपलब्ध असून सर्व प्रकारच्या रुग्णांना या ठिकाणी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

# डॉक्टरांनी स्वत:चे आरोग्यदेखील सांभाळावे; आयएमएकडून डॉक्टरांचा गौरव

पिंपरी(प्रतिनिधी) इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए)च्या पिंपरी-चिंचवड-भोसरी शाखेच्या वतीने विविध उपक्रमांनी आंतरराष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त आकुर्डीत डॉक्टरांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी आयर्न मॅन शर्यतीतील विजेते डॉ सलील पाटील, डॉ सुरेश पेठे, गिर्यारोहक डॉ शुभांगी टेकूरकर डॉ अनिरुद्ध टोणगावकर, छायाचित्रकार डॉ विनित कोल्हे डॉ निखिल बुरुटे, जल-रंग चित्रकार डॉ माया भालेराव, अभिनेते डॉ संजीव पाटील अशा विविध विषयावर चर्चासत्राचे आयोजित करण्यात आले होते. यावेळी डॉक्टर पेशा व्यतिरिक्त काही छंद जोपासल्यास शारिरीक अणि मानसिक फिटनेस राहण्यास मदत होते व इतरांना प्रेरणा मिळावी हा या मागचा हेतु होता. तसेच डॉक्टरांनी सामाजाचे आरोग्य जपताना स्वतःच्या आरोग्यावर देखील लक्ष दिले पाहिजेत.असा सूर चर्चा सत्रात सहभागी डॉक्टरांनी काढला.

आयएमएतर्फे राबवलेले विविध उपक्रम तसेच पर्यावरण दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले . यावेळी अध्यक्ष डॉ. माया भालेराव, सचिव डॉ.सारिका लोणकर, खजिनदार डॅा मनीषा डोईफोडे यांनी भूषविले. कार्यक्रम आयएमएचे विश्वस्त डॉ संजय देवधर, डॉ संजीव दात्ये, डॉ सुहास माटे,डॉ मोहन स्वामीनाथन,डॉ विजय सातव, डॉ. मनीषा पाटील, डॉ सुमीत लाड, डॉ सुशील मुथियान, डॉ ज्योती डेकाटे, डॉ ललित धोका, डॉ शैलजा माने, डॉ गीता करंबळेकर, डॉ प्रभाकर बुरुटे,डॉ.रुपाली चौधरी, डॉ रितू लोखंडे मोठ्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सूत्रसंचलनाची जबाबदारी डॅा सुधीर भालेराव , डॅा अमृता इंगळे , डॅा निहार इंगळे यांनी पार पाडली.

# 'व्यवस्थापन'च्या सीईटीसाठी आज शेवटची संधी

पुणे : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या बीबीए, बीसीए, बीएमएस, बीबीएम अशा अभ्यासक्रमांच्या अतिरिक्त 'सीईटी'साठी विद्यार्थ्यांना सोमवारपर्यंत (ता. ८) नोंदणी करता येणार आहे. नोंदणी प्रक्रियेला मिळत असलेल्या प्रतिसाद लक्षात घेऊन अधिकाधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी करावी, यासाठी महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी सेल) मुदतवाढ देण्यात आली आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, असे 'सीईटी' सेलने स्पष्ट केले आहे.

बीबीए, बीसीए, बीएमएस, बीबीएम या व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी यंदा पहिल्यांदाच 'सीईटी' परीक्षा घेण्यात आली. परंतु विद्यार्थी-पालकांना याबाबत माहिती नसल्याने अनेक विद्यार्थी परीक्षा देऊ शकले नाहीत. याबाबत विद्यार्थी, पालक आणि शिक्षण संस्थांनी प्रवेश परीक्षा कक्षाला व्यक्तीशः भेट देऊन, ईमेल, दूरध्वनी, तसेच अर्जाद्वारे अतिरिक्त परीक्षा घेण्याची मागणी केली होती. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी पुन्हा या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी 'सीईटी' परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी करण्याची सुविधा २९ जूनपासून उपलब्ध करून देण्यात आली. यापूर्वी या 'सीईटी'च्या नोंदणीसाठी तीन जुलैपर्यंत मुदत दिली होती. त्यानंतर विद्यार्थी-पालकांकडून मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी सीईटी सेलकडे करण्यात आली. याची दखल घेत सीईटी सेलने सोमवारपर्यंतची मुदत दिली आहे.

# राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयास अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्रदान

पुणे(प्रतिनिधी) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी सलग्नित असलेले जेएसपीएम ग्रुपचे राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयास अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्रदान करण्यात आला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नुकत्याच पार पडलेल्या विद्या परिषदेच्या शिफारशीवरून विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयास अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्रदान करण्यात आला. अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळालेल्या महाविद्यालयास विद्यापीठ व महाविद्यालयाची एकत्रित/सह पदवी प्रदान करता येईल. या पदवी प्रमाणपत्रावर विद्यापीठ आणि अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालय राजर्षी शाहू



अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे हे नाव आणि लोगो असणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमल बजावणीच्या अनुषंगाने महाविद्यालय भविष्यात पदवी बहाल करण्यासाठी सज्ज आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम १२३ व महाराष्ट्र शासन राजपत्र/ अधिसूचना असाधारण भाग ४ ब, दिनांक २२ मे २०२३ अन्वये विहीत केलेल्या मानके आणि कार्यपद्धती निश्चित करून तसेच विद्यापीठ अनुदान आयोग/ संबंधित शिखर संस्था/ परिसंस्था नियामक मंडळ/ आणि भारत सरकार, महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्याकडून वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, परिनियम, आदेश, मार्गदर्शक तत्वे इत्यादीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२४- २५ ते २०३३- ३४ या दहा वर्ष कालावधीसाठी अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्रदान करण्यात आला आहे.

अधिकारप्रदात्त महाविद्यालयासाठी संस्थापक सचिव प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांचे बहुमूल्य मार्गदर्शन आणि प्रेरणा लाभली तसेच संचालक प्रा. डॉ रवी जोशी,प्रा.अनिल भोसले तसेच रवी सावंत आणि कॅम्पस डायरेक्टर प्रा. सुधीर भिलारे यांचे सहकार्य लाभले. अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाच्या यशस्वीतेसाठी संचालक प्रा. डॉ. आर के जैन प्रा. डॉ. ए. एस देवस्थळी प्रा. डॉ. एस. जी. कांदळकर यांनी अथक प्रयत्न केले. महाविद्यालयातील सर्व सदस्य व प्राध्यापकांच्या सहभागानेच हे यश प्राप्त झाले. असे मत डायरेक्टर प्रा. डॉ. आर के. जैन यांनी व्यक्त केले. संस्थापक सचिव प्रा. डॉ. तानाजीराव सावंत , श्री गिरिराज सावंत यांनी सर्वांचे व्यक्तीस अभिनंदन केले. व महाविद्यालयाच्या पुढील उतुंग वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# काटेवाडीमध्ये तुकोबारायांच्या पालखीला मानाच्या मेंढ्यांचे पहिले रिंगण; सोहळा पाहण्यासाठी लाखो भाविकांची गर्दी

बारामती : काटेवाडी (ता. बारामती ) येथे जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचा मेंढ्यांचे रिंगण सोहळा पार पडला. राम कृष्ण हरी, ज्ञानबा-तुकाराम असा जयघोष करीत वैष्णवांच्या अलोट उत्साहामध्ये, वरुण राजाच्या साक्षीने मानाच्या मेंढ्या धावल्या. रिंगणाचा हा नेत्रदीपक सोहळा पाहण्यासाठी लाखो भाविकांनी गर्दी केली होती.

आषाढी वारीनिमित्त मजल दर मजल करीत वैष्णवांची वारी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होत आहे. संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा बारामती मुक्कामानंतर दुपारी काटेवाडीत भोजन व विश्रांतीसाठी विसावला होता. सणसर मुक्कामी मार्गस्थ होत असताना मेंढ्याचे रिंगण झाले. तुकोबांची पालखी काटेवाडी येथे पोहोचताच भक्तिमय वातावरणात ग्रामस्थांनी स्वागत केला. सुरुवातील परीठ समाजाकडून पालखीला धोतराच्या पायघड्या घालण्यात आल्या. विसाव्यानंतर पालखी सणसरच्या दिशेने निघाली असता यावेळी मानाच्या मेंढ्याचे



रिंगण पार पडले. एका पाठोपाठ एक अशा मेंढ्या धावल्या.

वारकरी पायी प्रवास, ऊन पावसाची तमा न बाळगता भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन पांडुरगाच्या दर्शनाची आस घेऊन निघतो. या दरम्यान रिंगण सोहळा म्हणजे या पायी प्रवासाचा शिण घालवणारा असतो. त्यामुळे वारकरी, टाळकरी, माळकरी, वीणेकरी , तुळशीवाल्या महिला पालखीभोवती हरिनामाचा गजर करीत रिंगणाभोवती उभ्या होत्या. रिंगण सोहळा झाल्यानंतर पालखीने इंदापूर तालुक्यात प्रवेश केला. रविवारी (ता. ७) रात्री सणसर येथे संत तुकाराम महाराज पालखीचा मुक्काम पार पडला.

आषाढी पालखी सोहळ्यामध्ये उभे रिंगण आणि गोल रिंगण अशा दोन रिंगणाच्या पद्धती पाहायला मिळतात. हा रिंगण सोहळा पाहायला दोन्ही पालखी मार्गावर वारकरी प्रचंड गर्दी करतात. मात्र काटेवाडीतील मेंढ्यांचे रिंगण हे संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यातील अनोखे वैशिष्ट्य आहे.